# प्रकरण तिसरे

## राजकीय चळवळी ( उत्तरार्ध )

## प्रकरण - तिसरे

### राजकीय चळवळी ( उत्तरार्ध )

स्वातंत्र्योत्तर काळात विशेषत: संस्थानच्या विलीनीकरणानंतर दक्षिण महाराष्ट्रात अनेक छोटे-मोठे राजकीय लढे झाले. त्या पैकी महाराष्ट्र आंदोलन, गोवा मुक्ती संग्राम, कोल्हापूरचे दत्तक प्रकरण, चीनी युध्दाचे राष्ट्रीय संकट, १९६९ ची कॉंग्रेस मधील फूट इत्यादी विषयाबाबत ' पुढारी ' ने पुढारी मध्ये कोणती भूमिका मांडली, या बाबत प्रस्तुत प्रकरणात आपण सविस्तर माहिती पाहाणार आहोत.

महाराष्ट्रात अनेक राजकीय आंदोलने झाली. या आंदोलनाच्या प्रक्षुब्ध काळात गणपतराव जाधवांनी आपल्या ' पुढारी ' दैनिकात अत्यंत सावधानतेने, संयमाने व जबाबदारीने लेखन केले. त्यांनी आपल्या लेखनाने जनतेची आणि नेत्यांचीही मने भडकावली नाहीत, त्यांनी संयमाने सर्वांना मार्गदर्शन केले. कोणत्याही पक्षाचा अथवा व्यक्तीचा मिंधेपणा पत्करला नाही. त्यांनी स्वतंत्र धोरणाने आणि अस्मितेने आपल्या दैनिकाचे संपादन केले. न्यायदानात जी न्यायमूर्तिची, नि:पक्षपाती भूमिका असते तशी संपादकांची ' पुढारी ' - कारांनी वठविली. आपल्या संपूर्ण वृत्तपत्रीय जीवनात गणपतराव जाधव यांनी न्यायाधीशांच्या नि:पक्षपाती भूमिकेचेच मराठी वृत्तपत्रात दर्शन घडविले. कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता त्यांनी स्वाभिमानाने, ताठ मानेने आणि या भूमिकेला शोभणाऱ्या नम्रपणाने त्यांनी मराठी वृत्तपत्र व्यवसायात आपली आदर्श प्रतिमा निर्माण केली. त्यांचे राजकीय महत्व फार आहे. राजकीय धडे त्यांना भास्करराव जाधव, दिनकरराव जवळकर, काकासाहेब

लिमये, कै. रामचंद्र बाबाजी जाधव ऊर्फ दासराम यांच्याकडून मिळाले. संयुक्त महाराष्ट्र लढयात त्यांनी आपली ठाम भूमिका मांडल्याचे आढळते.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ --

संयुक्त महाराष्ट्राचा लढा २५-३० वर्षे चालला होता. या व्यापक लढयात सेनापती बापटांपासून ते दाजीबा देसाई पर्यन्त अनेक रथी महारथी शर्थीने लढले. त्यापैकी काहींनी बलीदान केले. संयुक्त महाराष्ट्र चळवळ हे एक अपूर्व असे जन-आंदोलन होते. त्याला विचारांची एक पक्की बैठक होती. भाषावार प्रांतरचना हा कॉंग्रेसनेच मान्य केलेला ठराव ,या आंदोलनाचा आत्मा होता. नगर येथे इ.स.१९३७ मध्ये भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात श्री दत्तोवामन पोतदार यांनी भाषिक राज्याचा पहिला ठराव मांडला, त्यानंतर १९४० मध्ये मुंबई येथे संयुक्त महाराष्ट्र सभेची स्थापना करण्यात आली. त्यानंतर संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी अनेक परिषदा झाल्या. कॉंग्रेसने १९२० मध्येच आपल्या घटनेच्या पहिल्या मसुद्यातच भाषावार प्रांतरचनेचा निर्णय मान्य केला होता. परंतु देश स्वतंत्र झाल्यावर गुंतलेल्या हितसंबंधाचे राजकारण सुरु झाले. त्यातच दार कमिशनने भाषावार प्रांत रचनेची मागणी धुडकावून लावली. त्याचा परिणाम म्हणून तेलगू भाषिकांचे वेगळे राज्य निर्माण करण्याच्या मागणीसाठी श्रीरामुल्लु यांचा त्यांनी केलेल्या बेमुदत उपोषणात बळी पडला. त्यानंतर तेलगू भागात दंगली उसळल्या, अस्तित्वात नसलेल्या तेलगू प्रांताला पंडित नेहरुंना मान्यता द्यावी लागली. आंध्र प्रांताची निर्मिती हाच संयुक्त महाराष्ट्राच्या संघटित चळवळीचा आरंभ होता. मराठी भाषिकांचा वेगळा प्रांत अस्तित्वात असताना फाझल अली कमिशनने त्याचे वेगळेपण अमान्य केले. विदर्भाचे वेगळे राज्य सुचविले होते. तर मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी काढण्याचे कारस्थान सुरु झाले. सरदार पटेल ,स.का.पाटील आणि मोरारजी देसाई यांचे हे पूर्वी पासूनचे कारस्थान होते. मुंबईवर गुजराती

भांडवलदारांचे वर्चस्व होते. त्यांना मुंबई महाराष्ट्राची होणे परवडण्यासारखे नव्हते. म्हणून या भांडवलदारांचा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राला विरोध होता. इ.स.१९५५ मध्ये पंडित नेहरुंनी शंकरराव देवांना विचारले तुम्हाला मुंबई हवी की महाराष्ट्र? शंकररावांनी उत्तर दिले होते तुम्ही हृदय हवे का शरीर असेच विचारत आहात मुंबई महाराष्ट्राला न देता ते केन्द्रशासित ठेवण्याचा निर्णय घेऊन केन्द्र सरकारने महाराष्ट्राच्या अस्मितेला हात घातला होता. संपूर्ण महाराष्ट्र खडबडून जागा झाला. या अन्यायकारक निर्णया विरुध्द आवाज उठविण्यासाठी १५ नोव्हेंबर १९५५ रोजी मुंबईतील शिवाजी पार्कवर पहिली जाहीर सभा झाली. या सभेचे अध्यक्ष समाजवादी नेते एस.एम. जोशी होते. लढयात स्वत: सेनापती बापट होते. या महालढयात सेनापती बापट, शंकरराव देव, चिंतामणराव देशमुख,आचार्य अत्रे, लालजी पेंडसे, डॉ.नरवणे, शाहीर अमर शेख, दाजीबा देसाई, क्रांतिसिंह नाना पाटील, उध्दवराव पाटील, डॉ.वसंत रणदिवे आणिश्री.अ.डांगे, माधवराव बागल, असे अनेक रथी-महारथी उतरले होते. विविध पक्षांच्या, निरनिराळ्या जाती-जमातींच्या,ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर नेत्यांच्या सहयोगाचा तो एक अपूर्व मिलाफ होता.

## संयुक्त महाराष्ट्र परिषदा --

संयुक्त महाराष्ट्राची ही चळवळ सुरु झाली तेव्हा राजकीय पक्षांशी संबंध नसलेल्या पांच कर्मवीर व्यक्तींचे एक मंडळ नेमण्यात आले होते.त्यांचे प्रमुख होते प्रबोधनकार के.सी.ठाकरे आणि सेनापती बापट, `प्रभात` चे संपादक, वालचंद कोठारी,माधवराव बागल हे त्या पंचकाचे इतर सभासद होते.[१]

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी झालेल्या आंदोलनात कोल्हापूरच्या जनतेचा प्रारंभापासून अखेरपर्यन्त सिंहाचा वाटा होता.त्या आंदोलनाच्या पाच प्रमुख नेत्यांमध्ये माधवराव बागल एक होते. कोल्हापूर जिल्ह्याची संयुक्त महाराष्ट्र परिषद दि.११ मार्च १९४९ रोजी रात्री खासबाग मैदानात अत्यंत उत्साहात पार पडली .या परिषदेचे अध्यक्ष श्री.शंकरराव मोरे,आणि उद्घाटक

ना.म.जोशी होते. आपल्या अध्यक्षीय भाषणांत शंकरराव मोरे यांनी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे वर्गीय व आर्थिक स्वरुप स्पष्ट करुन हे आंदोलन देशाला दुर्बल बनविणारे नसल्याचे स्पष्ट केले. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी वर्गीय लढयाची घोषणा करणारा ठराव या परिषदेने एक मताने मंजूर केला. त्या ठरावावर के.सी.ठाकरे व नाना पाटील यांची जोरदार भाषणे झाली. कोल्हापूरच्या या संयुक्त महाराष्ट्र परिषदेचा वृत्तांत दै.पुढारीने दि.१२ मार्च १९४९ च्या अंकात पहिल्या पानावर दिला आहे. त्यावरुन आपल्या परिसरात होणाऱ्या जन आंदोलनाची पुढारी कशी तत्परतेने दखल घेत होता आणि जनतेच्या आशाआकांक्षा प्रतिबिंबित करत होता हे स्पष्ट होते.[२]

या परिषदेपूर्वीच काही दिवस श्री.न.वि.गाडगीळ व शंकरराव देव यांनी देशाच्या राजधानीत मुंबईसह महाराष्ट्राची मागणी केली आहे.[3]

सन १९५१ सालच्या जानेवारी महिन्याच्या प्रारंभी ठाणे जिल्हा संयुक्त महाराष्ट्र परिषद पार पडली.भाषावार प्रांतरचनेच्या दृष्टीने हे अधिवेशन फार महत्वाचे ठरणारे होते. सदर परिषदेचे अध्यक्ष समाजवादी साथी माधवराव गायकवाड होते व परिषदेचे उद्घाटन शे.का.पक्षाचे नेते श्री शंकरराव मोरे यांनी केले. या ठाणे परिषदेने संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या दिशेने एक महत्वाचे पाऊल टाकले. भाषावार प्रांतरचने संबंधी ठाणे परिषदेत पुढील ठराव मंजूर करण्यात आला ' लोकशाही भारतातील जनसमुदायामध्ये एकोपा वाढवून त्याला बलवान करण्याकरिता व स्वराज्याचे लोण प्रत्येक व्यक्ती-पर्यन्त पोचवून समाजवादी भारतीय संघराज्य निर्माण करण्याकरिता भारताची घटकराज्ये स्वायत,एकात्म,एकभाषी,आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण व सलग भूप्रदेश व्यापणारी असणे अत्यंत आवश्यक आहे ' . श्री शंकरराव मोरे यांनी आपल्या भाषणात संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी उघड चळवळीची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. परिषदेचे अध्यक्ष माधवराव गायकवाड यांनीही आपल्या भाषणात तोच मुद्दा थोडया वेगळ्या पध्दतीने मांडला ' संयुक्त

महाराष्ट्राच्या चळवळीची नवी दिशा ' या पुढारीच्या दि.११ जानेवारी १९५१ च्या अग्रलेखात ठाणे जिल्हा संयुक्त महाराष्ट्र परिषदेचा परामर्श घेऊन तिचे ऐत्याहासिक महत्व स्पष्ट करण्यात आले आहे. त्या अग्रलेखातील पुढील अभिप्राय अत्यंत महत्वाचा आहे.

' श्री मोरे यांच्या अध्यक्षतेखाली कोल्हापूरला झालेल्या संयुक्त - महाराष्ट्र परिषदेने नवी दिशा दाखविली आहे. ठाण्याच्या ह्या परिषदेने निसंदिग्धपणे पुढचे पाऊल टाकले आहे. संयुक्त महाराष्ट्र स्थापन होण्याबाबत कोणत्याच पक्षाचे दुमत राहिलेले नाही पण सर्व पक्षीय कडबोळे उपयुक्त ठरण्याचे दिवस संपले असल्याने हा प्रश्न प्रत्येक पक्षाने आपाआपल्या परिणे नेटास लावणे क्रम प्राप्त झाले आहे व तेच इष्ट होय. संयुक्त महाराष्ट्राची न्याय मागणी डालवणाऱ्या काँग्रेसला ही चळवळ जहाल गटांच्या हाती गेली तर कुरकुरण्याचे कारण नाही व त्यामुळे होणाऱ्या परिणामांचे खापर तीने स्वत:वर ओढून घेतलेच पाहिजे.[४]

दि.८ एप्रिल १९४९ रोजी सायंकाळी ६.३० वा. कोल्हापूर येथे बिंदू चौकात समाजवादी पक्षाच्या पाटणा अधिवेशनाचा संदेश प्रस्तृत करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे एक प्रमुख नेते श्री.एस.एम.जोशी यांचे व्याख्यान झाले. त्या व्याख्यानाचा पुढारीने ताबडतोब सविस्तर वृत्तांत प्रसिध्द केला आहे. श्री.जोशी आपल्या व्याख्यानात म्हणाले की ' संयुक्त महाराष्ट्राच्या मागणी विरुध्द काँग्रेसचे सर्वात मोठे नेते आहेत. त्यांनी भांडवलदारांची बाजू घेतल्याचे स्पष्ट दिसत आहे.कारण संयुक्त महाराष्ट्रातून मुंबईची फारकत करण्याचे जे कारस्थान शिजले आहे ते भांडवलदारांना खूष करण्यासाठीच होते. संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाल्यास त्या महाराष्ट्राची भूमी समाजवादास फार उपयुक्त आहे म्हणून त्यांना महाराष्ट्राची निर्मिती नको आहे. ' श्री जोशी पुढे म्हणाले की ' म.गांधीजींच्या खूनानंतर काँग्रेसही शेतकरी,कामगारांची राहिलेली नाही. उलट शेतकरी कामगारांचा कैवार घेणाऱ्या संघटना काँग्रेसमधून बाहेर पडाव्यात असे धोरण आखण्यात आले आहे. एवढेच नव्हे तर शेतकरी

कामगारांच्या संघटना दडपण्याचेही धोरण आजवर काँग्रेस सरकारने स्वीकारले आहे.[५]

१९५० साली दिल्ली येथे 'महाराष्ट्र भवन' च्या उद्घाटन प्रसंगी भारताचे तत्कालीन कायदे मंत्री डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 'पुढारी' च्या दिल्ली प्रतिनिधीने मुलाखत घेऊन संयुक्त महाराष्ट्र निर्मितीबद्दलचे त्यांचे मनोगत जाणून घेतले. त्या मुलाखतीच्या पुढारीत प्रसिध्द झालेला वृत्तांत पुढीलप्रमाणे -- 'भारतीय गणराज्य स्थापन झाले पण स्वतंत्र निसंयुक्त महाराष्ट्र मुंबई सह अद्याप व्हायचा आहे. त्या करिता महाराष्ट्रीयांनी स्वस्थ बसून कार्य होणार नाही, तर महाराष्ट्र धर्म संस्कृती नि उन्नति याकरिता संघटित झाले पाहिजे. अटकेपार मराठ्यांनी झेंडे लावले हा इतिहास जुना आहे. आपण तो पुनरपि घडवून आणला पाहिजे. प्रसंगी रक्त ही सांडले पाहिजे. शत्रूशी झुंज घेण्यास व देण्यास सदैव तयार झाले पाहिजे. मराठी बाणा कोणत्याही प्रसंगी सोडता कामा नये. एक मेका सहाय्य करुन,अवघे धरू सुपंथ ' असा तेजस्वी संदेश ना.आंबेडकर यांनी दिल्लीतील 'महाराष्ट्र भवन' चे उद्घाटन करताना दिला.[६] भारतीय घटनेच्या शिल्पकाराचे संयुक्त महाराष्ट्र निर्मितीबाबतचे मत आमजनतेपर्यन्त पोहोचवून पुढारीने संयुक्त महाराष्ट्राची बाजू बळकट करण्यास हातभार लावला.

दि.१६ जुलै १९५२ च्या अग्रलेखात 'पुढारी' कार ग.गो.जाधव यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीविषयी पुढील अभिप्राय व्यक्त केला आहे 'मुंबईचे महसूल मंत्री श्री. भाऊसाहेब हिरे यांनी कल्याण येथे भाषण करताना संयुक्त महाराष्ट्राची चळवळ करण्याची हीच वेळ आहे असे सांगितले.एप्रिल महिन्यात पंतप्रधान पं.नेहरुननी जेव्हा बेळगावास भेट दिली तेव्हाच आंध्र निर्मितीनंतर भाषावर प्रांतरचनेच्या स्थापनेसाठी एक वर्षाच्या आंत समिती नेमण्याचे त्यांनी आश्वासन दिले.महाराष्ट्र जर यावेळी स्वस्थ राहील तर अंती महाराष्ट्राचे अहित होणार आहे .महागुजरात समितीचे एक चिटणीस श्री.मगनलाल पंड्या यांनी मुंबई,खानदेश,डांग आदि भाग गुजरातचा असल्याचा दावा गेल्या महिन्यात केला. त्याचवेळी श्री.पुरुषोत्तमदास ठाकूरदास यांनी मुंबई स्वतंत्र ठेवण्याची

SHIVAJI UNIV LIBRARY

मागणी केली. व कोंकणी भाषिकवादाचे निमित्त पुढे आणले. बेळगांव जिल्ह्यातील चंदगड, खानापूर व कारवार या भागाच्या प्रश्नावर कर्नाटकाशी तर महाराष्ट्राच्या उत्तर सीमेबाबत हिन्दी भाषिकांशी महाराष्ट्राला दोन हात खेळावे लागणार असा रंग दिसत होता. सध्याचा काळ बंडाळीचा, वाटेल ती टिका झाली तरी मेंदू ठिकाणावर ठेवून सामोपचाराने झुंज देण्याचा हा काळ आहे. महाराष्ट्राला आपल्या राज्यनिर्मितीसाठी सदैव तयारीत राहिले पाहिजे. ऐक्याच्या मार्गाने चळवळ पुढे नेण्यात यावे असे मत हिरे यांनी व्यक्त केले होते.[७]

## मराठी साहित्य - संम्मेलन व संयुक्त महाराष्ट्र --

३६ वे अ.भा.साहित्य संम्मेलन अहमदनगर येथे १९५३ साली झाले. त्याबाबत 'पुढारी' काराने दि.४ नोव्हेंबर १९५३ च्या अग्रलेखात खालील मत व्यक्त केले आहे. संमेलनाच्या अध्यक्ष निवडीत वि.द.घाटे संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावरुन निवडून आले. मुंबई प्रश्नावरुन श्री. दादासाहेब मावळकर अध्यक्षपदासाठीच्या निवडणुकीत पराभूत झाले. या अधिवेशनात संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीस व त्यासाठी झालेल्या नागपूरकरारास पाठिंबा देणारा ठराव पास झाला. मराठी भाषेच्या व महाराष्ट्रीय जनतेच्या इच्छा पूर्ण होणे व खरी लोकशाही स्थापन होणे याचाच पाठ पुरावा या संम्मेलनाने केला. या साठी भारत सरकार लौकरच उच्चाधिकार समिती नेमणार असल्याने मराठी साहित्य संमेलनाने नागपूर-करारावर शिक्का मोर्तब केला. संम्मेलनापूर्वी मुंबईत मराठी साहित्य संघाच्या वतीने झालेल्या सत्काराच्यावेळी श्री.घाटे म्हणाले की, संयुक्त महाराष्ट्राच्या आड पक्ष आला तर मी त्याचा त्याग करीन. श्री.घाटे आपल्या भाषणात म्हणाले की आपण भाषावर राज्यांचा व त्यांच्या भाषांचा मूलभूत दृष्टीने विचार करुन चांगला पुरस्कार केलेला आहे. त्यांनी नागपूरकराराचाही उल्लेख केला.[८]

बृहन्महाराष्ट्र परिषदेचे २१ वे वार्षिक अधिवेशन दिल्ली येथे झाले.

या परिषदेचे अध्यक्ष श्री भाऊसाहेब हिरे होते `आपली भाषिक राज्याची मागणी ही जनतेची मागणी झालेली आहे. आम्ही ज्याला सलग, अखंड, संयुक्त महाराष्ट्र अशी विविध नांवे देतो ती नावे अशिक्षित शेतकरी बोलत नसेल, परंतु `मला माझी गाऱ्हाणी माझ्या भाषेत बोलू `द्या आणि त्या भाषेतच तो ऐकणारा राज्यकर्ता मला हवा हे मागणे त्यांनी मांडले. १७ टक्के श्रीमंतवर्ग, ८२ टक्के गरीबावर किती काळ आपली अनियंत्रित सत्ता ठेऊ शकेल हा प्रश्न हिंदुस्थानातील ७ लाख खेडयांचा आहे. एका प्रांताचे नव्हे तर साऱ्या देशानेच या विषमतेला दूर करण्याचे ठरविले आहे. महाराष्ट्रावरच हा अन्याय का ?` असे उद्गार श्री. भाऊसाहेब हिरे यांनी काढले. महाराष्ट्रातील नेते व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात या परिषदेत सहभागी झाले. या परिषदेचे स्वागताध्यक्ष खासदार न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ यांनी सर्वांचे स्वागत केले. बृहण महाराष्ट्र परिषदेच्या सदर अधिवेशनाचे महत्व लक्षात घेऊन पुढारीने दि. १५ नोव्हेंबर १९५३ च्या आपल्या अग्रलेखात त्याची विशेष नोंद घेतल्याचे आढळते.`

. फाजल अल्ली कमिशनचा अहवाल --

फाजल अल्लींच्या नेतृत्वाखाली राज्य पुनर्रचना मंडळाचा अहवाल दिनांक १० ऑक्टोबर १९५५ रोजी प्रसिध्द झाला. या अहवालांत एकूण १६ राज्ये सुचविली होती. काश्मीर सोडून बाकी सर्व १४ राज्यांचा पाया प्रत्यक्षात भाषेची एकी हाच धरला होता. या बाबत` पुढारी ने आपल्या अग्रलेखात खालील प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. महाराष्ट्राच्या बाबतीचा राष्ट्रऐक्याच्या नावाखाली अन्याय केला गेला आहे. मुंबई, हैद्राबाद व मध्यप्रदेशातील सर्व मराठी भाषिक प्रदेशांचा मुंबई राजधानीसह संयुक्त महाराष्ट्र स्थापन करावा, अशी मागणी असताना फाजल अल्ली समितीने विदर्भाचे वेगळे राज्य सुचविले आहे. गुजरातचे पारडे जड करण्यासाठी मुंबईत मराठी गुजराती भाषिकांचे संमिश्र राज्य लादले असून त्यात सौराष्ट्र व कच्छ यांचा समावेश केला आहे. श्री. शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीला गेलेल्या महाराष्ट्र कॉंग्रेस शिष्ट मंडळाला

पं.नेहरूंनी राष्ट्रैक्याच्या भावनेने सहकार्य केले. महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसने केलेला ठराव हा एक टप्पा होता. या टप्प्यावर न थांबता संयुक्त महाराष्ट्र स्थापन होण्यासाठी सर्वांची पावले पडली पाहिजेत [10]. पुढारीची ही प्रतिक्रिया अचूक व मार्मिक आहे.

• मुंबई महापालीकेचा ठराव --

मुंबई महापालीकेची दि.२३ डिसेंबर १९५५ रोजी सर्वसाधारण सभा झाली.या सभेत प्रजासमाजवादी पक्षाचे प्रो.राम जोशी यांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व महागुजरांत अशी दोन राज्ये स्थापण्याची मागणी करणारा ठराव मांडला.मात्र प्रत्यक्षात या ठरावावर सहा सभा झाल्या. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याच्या कल्पनेला मुंबईतून पार्लमेंटवर ,प्रांतिक कायदे-मंडळावर निवडून गेलेले सभासद व मुंबई महापालीकेतील सदस्य यांचा विरोध आहे असे श्री.स.का.पाटील यांना वाटत होते पण हा ठराव ६३ विरुध्द शून्य मतानी पास झाला. `पुढारी` च्या दि.२४ डिसेंबर १९५५ च्या अग्रलेखात ठराव पास झाल्याने स.का.पाटील यांना धडा मिळाला.जनतेचा कल त्यांना समजला तसेच परप्रांतीय लोकांनाही त्यामुळे धडा मिळाला असे मत व्यक्त केले आहे. दि.२१ नोव्हेंबर १९५५ रोजी मोठ्या संख्येने जनतेने निदर्शने केल्यामुळे जनतेच्या बाजूनी कौल मिळाला. या विजयाची दखल घेऊन कॉंग्रेस श्रेष्ठींनी महाराष्ट्रास न्याय दिला असे मत ही `पुढारी` ने व्यक्त केले आहे.[11]

• श्री.शंकरराव देव यांचे उपोषण --

पुढारीच्या दि.२९ जानेवारी १९५६ च्या अग्रलेखात शंकरराव देवांच्या उपोषणाबाबत व त्यांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिकांच्या प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे यासाठी शंकरराव देवांनी दि.३-२-१९५६ पासून अकरा दिवसांचे उपोषण जाहिर केले,त्यांनी त्यासंबंधीचे एक निवेदनही काढले ,त्या निवेदनात आपल्या निर्णयामागचे

कारण सांगितले. गेल्या १०-१२ दिवसांत मुंबईत व महाराष्ट्रात इतरत्र दंगली चे प्रकार झाले, त्यामुळे व्यथित होऊन हे उपोषण करत होते. श्री.देव यांनी कॉंग्रेस श्रेष्ठींचे, विशेषत: पंतप्रधान पं.नेहरूंचे मन वळविण्याची फार मोठी आशा बाळगली होती. सर्व पक्षांनी संयुक्त महाराष्ट्र परिषदेला सर्व अधिकार दिले. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावरच त्यांनी ठाम भूमिका घेतल्याने सरदार पटेल यांनी त्यांच्या राजकीय आयुष्यास फार मोठा धक्का दिला. महाराष्ट्राच्या नेत्याविषयी जनतेत गैर समज व्हावा व उपोषणाने तो वाढावा हे इष्ट नव्हे म्हणून श्री देव यांनी आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा. सरकारी अन्यायाला व दडपशाहीला बाजूला ठेवून जनतेला दूषण देणारे उपोषण रद्द करावे असे मत पुढारीने व्यक्त केले.[१२]

### मुंबई बाबत तडजोड --

लोक सभेत राज्यपुनर्रचना विधेयकावर चर्चा चालू असताना मुंबईच्या भवितव्याविषयी विविध सदस्यांनी जी भूमिका मांडली तिचा पुढारीच्या दि. ६ एप्रिल १९५६ च्या अग्रलेखात परामर्श घेण्यात आला आहे. अग्रलेखातील अभिप्राय पुढील प्रमाणे आहे. राज्यपुनर्रचना विधेयकावर लोकसभेत चर्चा चालू आहे ते विचारांत घेता सरकारला मुंबईच्या प्रश्नावर महाराष्ट्रीयांचे समाधान होईल अशी तडजोड करावी लागेल असे वाटते. कांही अपवाद वगळता सर्वांनी मुंबई महाराष्ट्रात घालावी असे मत व्यक्त केले. यावेळी अर्थमंत्री ना. चिंतामणराव देशमुख यांनी राजीनामा दिला. त्यामुळे मोठा पेचप्रसंग निर्माण झाला. ते 'कुलाबा' मतदारसंघातील खासदार होते. या जिल्ह्याचेच नव्हे तर सर्व कोकण भागाचे जीवन मुंबईवर अवलंबून आहे, त्यांनी यापूर्वीच राजीनाम्याचा निर्णय घेतला होता. श्री.काकासाहेब गाडगीळ यांनी आपल्या भाषणात, मुंबई ही महाराष्ट्राची असून आज ना उद्या ती महाराष्ट्रात सामील करण्याची नि:संदिग्ध घोषणा पं.नेहरूंनी करावी व महाराष्ट्राची राजधानी मुंबई ठेवण्यास मान्यता द्यावी असे मत व्यक्त केले.[१३]

अविश्वास ठराव --

संयुक्त महाराष्ट्र व महागुजरातच्या चळवळींत पोलीसानी केलेल्या गोळीबारात १०५ लोक ठार झाले. न्यायालयीन चौकशीस सरकारने नकार दिला. तेव्हा विरोधी पक्षांनी सरकार विरुध्द अविश्वास ठराव मांडला. ठराव चर्चेस आला असता ३९ विरुध्द २२४ मतांनी फेटाळला गेला. सरकार पक्षाचे बहुमत होते त्यामुळे तो ठराव फेटाळला गेला. स्वातंत्र्योत्तर काळात मुंबई राज्यात ११८५ वेळा आणि स्वातंत्र्यापूर्वीच्या आठ वर्षांत ३८२ वेळा गोळीबार झाल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनीच चर्चेच्यावेळी विधान सभेत सांगितली. या घडामोडीवर पुढारीने दि.१८ ऑक्टोबर १९५६ च्या आपल्या अग्रलेखात सडेतोड टीका केली आहे. अग्रलेखात असे म्हटले आहे की म.गांधी यावेळी असते तर त्यांना आपल्याच शिष्यांनी चालविलेला हा प्रकार पाहून लाजेने मान खाली घालावी लागली असती. विरोधी पक्षाच्या आमदारांनी जे विचार मांडले त्या पेक्षा वेगळे विचार कॉंग्रेस आमदारांचे नव्हते. मात्र पक्ष-शिस्तीमुळे त्यांना ते मांडता येत नाहीत, त्यामुळे अविश्वासाचा ठराव फेटाळला गेला, असला तरी त्याचा हेतू साध्य झाला आहे हे नाकारता येणार नाही.[१४]

संयुक्त महाराष्ट्र समितीचे सरचिटणीस श्री.एस.एम.जोशी यांनी आपल्याला पदमुक्त करण्याची विनंती केल्यामुळे संयुक्त महाराष्ट्र समितीमधील बेदिली चव्हाट्यावर आली. त्याची पुढारीने आपल्या अग्रलेखात यथायोग्य नोंद घेतलेली आढळून येते. संयुक्त महाराष्ट्र समितीचे सरचिटणीस श्री.एस.एम.जोशी यांनी या सरचिटणीशीतून आपणास मुक्त करावे अशी विनंती समितीच्या ता.२० नोव्हेंबर १९५९ च्या जनरल कौन्सिलच्या बैठकीत केली असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. श्री. जोशी सारख्या सच्च्या कार्यकर्त्यास समितीच्या या जबाबदारीच्या जागेतून मोकळे होण्याची अगदी घाई व्हावी यांत बराच खोल मतितार्थ असला पाहिजे. समितीतील मंडळींनी जोशींच्यावर असा आरोप ठेवला की पंतप्रधान पं.नेहरूंनी मुंबईस भेट दिली असता श्री .जोशी यांनी घाईने

त्यांच्याशी गुप्त स्वरूपाच्या वाटाघाटी केल्या आणि या वाटाघाटींत त्यांनी आपल्या पक्षाच्यावतीने कांही वेगळी भूमिका पंतप्रधानांना निवेदन केली. हा आरोप समितीतील इतर पक्ष श्री.जोशींच्यावर करीत होते, त्यामुळे श्री.जोशी यांनी जबाबदारीतून आपणास मुक्त करण्यास सांगत होते असे स्पष्ट 'पुढारी' ने दि. २४ नोव्हेंबर १९५९ च्या अग्रलेखात व्यक्त केले आहे.[१५]

. विशाल महाराष्ट्र --

'पुढारी' कार ग.गो.जाधव यांनी दि.१७ मार्च १९६० च्या अग्रलेखात विशाल महाराष्ट्र बाबत खालील मत प्रतिपादन केले आहे. गुजरात राज्याच्या स्थापनेनंतर राहिलेल्या मुंबई राज्यास महाराष्ट्र राज्य असे संबोधण्यास येईल अशी अधिकृत घोषणा ता.१५ मार्च १९६० रोजी मुंबई राज्याचे मुख्यमंत्री ना.यशवंतराव चव्हाण यांनी केली. या घोषणेला अधिकृत असे म्हटले त्याचे कारण की उर्वरित मुंबई राज्यास कसे संबोधावे यासंबंधी कॉंग्रेसच्या वरिष्ठांनी आग्रह धरलेला नसून या बाबत विधानसभेने निर्णय घ्यावा. ना.यशवंतराव चव्हाण यांच्या निवासस्थानी ता.१४ रोजी झालेल्या बैठकीत 'महाराष्ट्र' असेच उर्वरित मुंबई राज्यास संबोधावे असा निर्णय एकमताने घेण्यात आला. मराठी भाषिकांचे एकछत्री राज्य निर्माण व्हावे, यासाठी ना.चव्हाणांना श्रीमती इंदिरा गांधी यांचे साहाय्य सर्वात अधिक झाले. अर्थात महाराष्ट्राने श्रीमती इंदिरा गांधी व पर्यायाने पंतप्रधान नेहरू यांच्याबद्दलही कृतज्ञ असले पाहिजे. ना.चव्हाणांना धन्यवाद देणे महत्वाचे आहे असेही मत 'पुढारी' ने व्यक्त केले.[१६]

. महाराष्ट्र राज्याचे स्वागत --

'पुढारी' कार यांनी दि. २ एप्रिल १९६० च्या अग्रलेखात भावी महाराष्ट्र राज्याचे स्वागत केले आहे. 'नवीन महाराष्ट्र राज्याची स्थापना दि.१ मे रोजी होणार आहे. दि.२७ मे रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म दिन असल्याने त्यास जोडून हा सोहाळा साजरा केला जावा ही सूचना सर्वांनी

मान्य केली. भारताचे पंतप्रधान पं.नेहरू हे मुंबईतील जाहीर सभेत भाषण करुन महाराष्ट्र राज्याचे उद्घाटन करतील आणि रात्री राजभवनावर नवीन महाराष्ट्र राज्य मंत्रीमंडळाचा शपथ विधि होईल. कोकणवासीय व इतर जनतेतर्फे मुंबईत ना.यशवंतराव चव्हाण यांचा सत्कार झाला. सत्कारात बोलताना ना.चव्हाण म्हणाले केवळ मुंबईत नव्हेतर जिल्ह्यांच्या शहरात आणि प्रत्येक खेड्यात दिवाळी-प्रमाणे हा उत्सव साजरा करावा. शिवाजी महाराजांची राष्ट्रप्रेमाची आणि बंधुभावाची शिकवण व महाराष्ट्र राज्याचा सर्वांगीण उध्दार याबाबतीत भाषणे घडवून आणणे हेहि आम्हास इष्ट व आवश्यक वाटते.[१७]

संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्मितीचे स्वप्न अखेर खरे ठरले. समितीच्या चळवळीमुळे पं.नेहरू आणि कांग्रेस यांना यशवंतरावांची किमंती मान्य करावी लागली. त्याप्रमाणे १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य निर्माण झाले.याप्रसंगी लिहिलेल्या अग्रलेखात पुढारीने खालील अभिप्राय व्यक्त केला आहे. महाराष्ट्र जन्माला आला. । ऐतिहासिक आणि भौगोलिक सत्य प्रतिष्ठित झाले.भारताच्या राजकीय क्षितीजावर एक नवीन तारा उदयास आला आहे. मराठी माणसांच्या दृष्टीने ही घटना विलोभनीय आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना ही एक भौगोलीक बाब आहे. महाराष्ट्र प्रस्थापना ही एक ऐतिहासिक घटना आहे. इतिहासकाळात महाराष्ट्राने जो तेजस्वी कालखंड निर्माण केला त्याच तेजाच्या पार्श्वभूमीवर आजचा महाराष्ट्र प्रस्थापित आहे. या नव्या महाराष्ट्र राज्याचे सूत्रधार मुख्यमंत्री ना.यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रातील कूट प्रश्न अचूक हेरले. महाराष्ट्राच्या नाडीचे ठोके इतके अचूक मोजणारा नेता महाराष्ट्राला लाभला ही महाराष्ट्राच्या दृष्टीने परम भाग्याची गोष्ट आहे.[१८]

हे यश महाराष्ट्र ऐकीचे होते. नि:स्वार्थी नेत्यांच्या प्रेरणेतून आकाराला आलेल्या जन-आंदोलनाचे होते. संयुक्त महाराष्ट्राच्या लढयासाठी व मुंबईस महाराष्ट्राची निर्मिती व्हावी, अनेकांनी आत्म बलिदान केले. महाराष्ट्राची आपल्या रक्तातून निर्मिती केली. हाच खरा म्हणजे १ मे १९६०

`सोन्यिा` चा दिवस म्हणून ओळखला जातो म्हणून आपण अभिमानाने सांगू शकतो. मुंबईसह महाराष्ट्र माझा आहे अशा प्रकारे संयुक्त महाराष्ट्राचा लढा संपला व मुंबईस महाराष्ट्राची निर्मिती झाली.

गोवा मुक्ती संग्राम --

सन १९४७ साली ब्रिटिश भारतातून निघून गेले तरी येथील पाश्चात्य साम्राज्यशाहीचा शेवट झाला नाही. फ्रेंच व पोर्तुगीज भारतातील आपल्या वसाहतीत घट्ट पाय रोवून उभा होते . पोर्तुगीज तर गोवा,दमण आणि दीव यावर आपला ४०० वर्षांचा हक्क सांगू लागले होते. त्यांच्या मते भारत हे नव्याने जन्माला आलेले राष्ट्र होते. पोर्तुगाल अमेरिकेचा `नाटो` संघटनेचे सभासद असल्याने पोर्तुगीज राज्यकर्त्यांच्या वर्तनात मग्रुरी आली होती. त्यामुळे भारतातील पोर्तुगीज वसाहती मुक्त करण्यासाठी तेथील व देशातील जनतेला संग्राम द्यावा लागला. गोवा मुक्ती संग्रामाबद्दल वेळोवेळी `पुढारी` ने स्वीकारलेल्या भूमिकेची येथे चर्चा करावयाची आहे.

गोवा मुक्ती संग्राम --

पुढारी दि. २४ फेब्रुवारी १९५५ च्या अग्रलेखात गोवा मुक्ती संग्राम विषयी चर्चा केली आहे. हैद्राबादचा प्रश्न संपल्यावर पोर्तुगीजांच्या अमलाखाली गोव्यातील जनतेने स्वातंत्र्याचा लढा सुरु केला. ही बातमी गोमंतकांतून सर्वांना मिळू लागली. भारतातील गोवा,दमण व दीव हे छोटे प्रदेश पोर्तुगालच्या ताब्यात होते. नंतर ते स्वतंत्र राष्ट्र आहे व अमेरिकेशी त्याचा `नाटो` संरक्षण करार झाला आहे ते गोव्यावर चारशे वर्षांचा हक्क सांगू लागले पण पोर्तुगालने गोव्यात कितीही सैन्य व दारुगोळा भरला तरी भारतीय जनतेच्या प्रक्षोभामुळे पोर्तुगीज सत्ता नष्ट होईल असे पुढारीचे भाकीत होते. पुढारी ने गोव्यातील जनतेला आवाहन केले की, स्वातंत्र्याचा लढा जिंकण्यासाठी कितीही हाल झाले तरी सहन करावे. त्यांच्या पाठीशी सर्व भारतीय जनता आहे.

मुंबईतील गोवेकरांच्या तुकड्या सत्याग्रहासाठी जाणार आहेत. गोवा मुक्ती संग्राम हा भारतीय स्वातंत्र्यलढयाची एक पुढील पायरी आहे. गोव्यातील स्वातंत्र्य लढयात सर्व प्रकारे सर्व भारतीयांनी मदत करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. गोव्यातील लढयास जोर आणण्यासाठी गोमंतकीय व इतर सर्व भारतीय जनतेने त्यात सहभागी व्हावे. भारतातील राहिलेल्या फ्रेंच व पोर्तुगीज वसाहती संपविणे हे स्वातंत्र्य लढयाचे अंतीम उद्दिष्ट आहे इत्यादी पुढारी ने आपल्या अग्रलेखात मांडल्या आहेत.[१९]

गोव्यातील सत्याग्रह --

पुणे येथे डिसेंबर १९५४ मध्ये स्थापन झालेल्या सर्व पक्षीय गोवा विमोचन साहाय्यक समितीने गोव्यातील स्वातंत्र्यलढयासाठी सत्याग्रही पाठविण्याचे ठरविले व समितीचे प्रमुख प्रजासमाजवादी पक्षाचे नेते श्री. ना.ग. गोरे यांनी स्वत: मे महिन्याच्या १५ तारखेस गोव्यात सत्याग्रह करण्याचे जाहीर केले. मे महिन्याच्या प्रारंभी गोव्यात सौ.सुधाताई जोशी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या गोवा राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनाचे पर्व सुरु होणार असे दिसताच गोव्यातील चळवळीला उग्र स्वरुप व पोर्तुगीजांच्या झोटिंगशाही मुळे स्वातंत्र्य लढयास मोठ्या प्रमाणात धार चढली. पाशवी सत्तेविरुध्द सत्याग्रहाचे आंदोलन करणाऱ्या गोवेकरांना प्रत्यक्ष मदत केल्याशिवाय त्यांचा टिकाव लागणार नाही, हे बाहेरच्या लोकाना दिसु लागल्याने गोवेकरांना धीर वाटण्यासाठी व त्याची स्वातंत्र्याची मोहिम यशस्वी होण्यासाठी भारतातून मोठ्या प्रमाणावर प्रयत्न झाले पाहिजेत हा विचार बळावू लागला. गोवा हा भारताचा अविभाज्य घटक आहे व तो मुक्त करण्याचा भारतीयांना पूर्ण हक्क आहे, ही तात्वीक भूमिका भारत सरकारने सोडली नाही. गोव्यातील दडपशाही-विरुध्द व सत्याग्रहींना पोर्तुगालमध्ये वा आफ्रिकेत हद्दपार करण्याविरुध्द भारत सरकारने पोर्तुगीज सरकारला वेळोवेळी कडक इशारे दिले. श्री.ना.ग.गोरे यांनी असे आवाहन केले की, सरकारच्या अडचणी काहीही असल्या किंबहुना

त्या आहेत म्हणूनच भारतीय जनतेने गोव्याचा प्रश्न सोडविण्यास पुढे येणे जरूर आहे. या दृष्टीनेच भारतांतून पाच हजार सत्याग्रही पुढे आल्यास गोव्याचा प्रश्न सुटेल असा विश्वास व्यक्त करून त्यांनी सर्व पक्षांना सहकार्याचे आवाहन केले आहे.[२०]

अमेरिकेची भूमिका --

गोवा मुक्तीसाठी चाललेला भारतीयांचा गोव्यातील सत्याग्रह भारत सरकारच्या धोरणामुळे जवळ जवळ थांबला असला तरी हा प्रश्न राष्ट्रीय तसाच आंतरराष्ट्रीय महत्वाचा असल्याने त्या विषयी महत्वाची निवेदने व खुलासे अधून मधून केले जात होते. अमेरिकेचे भारतातील वकिल श्री जॉन शेरमन कूपर यांनी मुंबईत पत्रकार बैठकीत गोव्याबाबत अमेरिकेच्या धोरणाविषयी असाच एक खुलासा केला होता.तो असा की अमेरिकेने वसाहतवाद कधीही उचलून धरला नाही. या विधानाचा पुढारीने आपल्या अग्रलेखात समाचार घेतला. त्याचे हे विधान खरे ठरत नाही. अमेरिकेन सरकार वासाहतिक सत्ता नष्ट होण्याचा आड येत आहे म्हणून श्री.कूपर यांनी केलेले हे समर्थन लंगडे ठरते. केवळ पुरोगामी विचारसरणीच्या विरुध्द अमेरिका नाही हे सांगण्याचाहा व्यर्थ खटाटोप आहे. भारत व पोर्तुगाल यांच्यातील गोव्याचा प्रश्न शांततेने मिटेल असे अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री श्री.जॉन फास्टर यांनी म्हटले आहे. या प्रश्नावर अमेरिकेने कोणतीही भूमिका घेतली नाही, असे उत्तर श्री.कूपर यांनी एका प्रश्नास उत्तर दिले. गोव्याचा प्रश्न पोर्तुगालवर जरूर तितके पुरसे दडपण येऊन शांततेने सुटण्याच्या मार्गात अमेरिका व ब्रिटन ही मुख्य पश्चिमी राष्ट्रे येत आहेत. अमेरिकेने मनात आणले तर हा तंटा शांततेने मिटणे सहज शक्य होईल. आशियातील जनतेला आनंद होईल' पुढारी' च्या दि.२२ मे १९५५ च्या अग्रलेखातून गोव्याबाबत अमेरिकेची भूमिका कोणती होती ते सहज समजू शकते.[२१]

पंतप्रधानांचे संसदेत वक्तव्य --

दै. `पुढारी` च्या दि.६ मे १९६१ च्या अग्रलेखातून गोव्याविषयी संसदेत पंतप्रधानांनी कोणते वक्तव्य केले या विषयी आपणास माहिती मिळू शकते. दि.४ मे १९६१ रोजी राज्यसभेत केलेल्या भाषणामध्ये पं.नेहरूंनी पोर्तुगीज गोवा भारतात विलीन होईल तेंव्हा त्याला कोणत्याही राज्यात समाविष्ट करून घेण्यात येणार नाही.तर गोवा हा एक भारताचा स्वतंत्र विभाग राहिल व तो केन्द्र सरकारच्या अमंलाखाली येईल असे सांगितले. पंतप्रधानांच्या या वक्तव्यावर भाष्य करताना `पुढारी` ने आपल्या अग्रलेखात म्हटले आहे की वास्तविक पंतप्रधानांच्या या विधानाची आज मुळीच गरज नव्हती कारण जी घटना पुढे केव्हा तरी व्हावयाची आहे आणि ज्या घटनेच्या सिध्दीसाठी सरकार प्रात्यक्षिक स्वरूपाची अशी कोणतीही उपाय योजना करीत नाही ती सिध्द झाल्यानंतर आपण काय करू हे सांगणे अप्रस्तुत होय. पंतप्रधान पुढे म्हणाले `गोव्याने काय करावयाचे हे तेथील जनतेने ठरवावयाचे आहे गोवा हे एक मोठे बंदर आहे. त्याचा उपयोग भारताला होणार आहे. गोव्याच्या भूमिवर विशिष्ट दृष्टिकोण लादणे हे लोकशाहीच्या संकेतास अनुसरून नाही` पंतप्रधानांनी भाषणामध्ये कांही विशिष्ट भूमिका स्वीकारली. त्यांनी पुढे असा खुलासा केला की गोव्यातील जनतेची राहण्याची पध्दती,भाषा,धर्म यांचे संरक्षण प्रथम झाले पाहिजे. `पुढारी` कार ग.गो.जाधव म्हणतात की आम्ही गोव्याचा प्रदेश जवळून पाहिला आहे. गोव्याच्या स्वातंत्र्यार्थ गोव्यातील जी घराणी पिढ्यानपिढ्या लढली त्याचा इतिहासही सर्वांना माहित आहे. गोव्याची भाषा कोंकणी ( मराठी ) धर्म हिंदु,आचार विचार सर्व मराठा मुलखातील लोकांसारखे आणि या जनतेच्या आकांक्षाही मराठी जनतेशी जुळणाऱ्या अशा आहेत. गोव्यातील लोकांचा संबंध ( घनिष्ठ ) मुंबईशी आहे. आणि मुंबई म्हणजे महाराष्ट्राचे प्रतिबिंब अशी परिस्थिती आहे.[२२]

गोवा मुक्ती संबंधी प्रत्यक्ष जी लष्करी कारवाई झाली त्यासंबंधी

`पुढारी` ने खालील भाष्य केले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १४ वर्षांनी गोवा मुक्त झाला. १७ डिसेंबर १९६१ रोजी भारतीय सैन्याने दीव,दमण व गोव्यात लोकांच्या सरबत्ती खाली प्रवेश केला. आणि अवघ्या ४८ तासात गोवा मुक्त केला. याचे कारण पोर्तुगाजांचे २००० गोरे सैनिक शरण आल्याचे जाहीर होताच गोव्यातील जनतेकडून भारतीय सैन्याचे मोठ्या उत्साहाने स्वागत झाले. पं.नेहरूंनी ही भारतीय फौजांचे अभिनंदन केले. लष्करी मोहिम यशस्वीरित्या पूर्ण झाल्यावर भारतातील पोर्तुगीज प्रदेशाचा कारभार भारत सरकारने आपल्याकडे औपचारिकरित्या घेतल्या नंतर गोवा, दमण व दीव या प्रदेशावर भारतीय ध्वज फडकू लागला. दक्षिण विभागाचे सेनाप्रमुख ले.ज.जे.एन. चौधरी यांनी पोर्तुगीज कमांडरकडून पोर्तुगीज फौजाची शरणागती औपचारिक-रित्या स्वीकारली. सैन्याच्या पणजी येथील मुख्य ठाण्याच्या चौकात सकाळी अत्यंत गंभीर वातावरणात साधेपणाने हा समारंभ पार पडला. पोर्तुगीज ध्वज खाली उतरविण्यात आला व त्या ठिकाणी भारतीय ध्वज फडकविण्यात आला. या आधी उघड्या जीप मोटारीतून जनरल चौधरी पणजी शहरात आले तेव्हा तेथील जनतेने `जयहिंद` घोषणा देऊन त्यांचे स्वागत केले. लष्करी गव्हर्नर जनरल म्हणून सकाळी चार्ज घेतलेले मे.जनरल कॅन्डेथ यांनी जाहीर केले की, सर्व जनतेच्या व मालमत्तेच्या सुरक्षितेची हमी घेणे माझे कर्तव्य आहे. भारतीय संघ राज्यात या प्रदेशाचा औपचारिक समावेश करण्याचा कायदा करण्यासाठी योजना पार्लमेन्टला सांगितली जाईल ` अशा प्रकारे गोवा मुक्ती संबंधी जी लष्करी कारवाई झाली तीचे वर्तमान वरील प्रमाणे `पुढारी` मध्ये आढळते.[२३]

गोवा मुक्ती संग्राम बाबत `पुढारी` कार ग.गो.जाधव यांनी खालील भूमिका विशद केली आहे. सार्वभौम भारताला लागलेले ग्रहण दूर झाले.अर्थातच हा विजय केवळ स्वतंत्र भारताच्या फौजांचा नव्हता तर अवघ्या गोमंतक जनतेचा होता. ४५० वर्षे एक चिवट पोर्तुगीज साम्राज्यशाही सत्ता गोव्यात बंदुकिच्या जोरावर जुलमी अंमल चालवत होती. तो जुलूम संपला आणि `विजयी विश्व तिरंगा` अभिमानाने गोव्यात फडकू लागला. दरवर्षी आंदोलने अधिक तीव्र

होत होती. पोर्तुगीजांनी हा प्रश्न आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याची खटपट केली होती. भारताने गोव्यात सैन्य घुसविल्यास त्याचे वाईट परिणाम होतील, अशा अर्थाच्या धमक्या इंग्लंड,अमेरिका देऊ लागले होते. पं.नेहरू नी या दादागिरीला न जुमानता भारतीय सैन्य गोव्यात घुसवले. तेथील प्रदेश ताब्यात घेऊन पोर्तुगीजांना शरण आणले. आणि १९ डिसेंबर १९६१ रोजी गोवा मुक्त झाला. पोर्तुगीजाने ४०० वर्षे राज्य केले आहे व त्यांनी भाग सोडून द्यावा, कारण गोवा हा भारताचा अविभाज्य घटक आहे. त्यांनी गोव्यातील जनतेवर अनेक अत्याचार केले.त्यांना अन्यायकारक वागणूक दिली आहे. शेवटी सत्याचा विजय होतो, त्या प्रमाणे भारतीयांचा विजय झाला. एक ना एक दिवस पोर्तुगीजांना गोवा सोडून जावे लागणार होते. या विषयी पुढारी ने जे भविष्य वर्तविले होते ते शेवटी खरे झालेले आपणास पहावयास मिळते.

सीमा प्रश्न --

१९५६ साली भाषावार प्रांत रचना अस्तित्वात आली. त्यानुसार कानडी भाषीकांचे कर्नाटक हे राज्य अस्तित्वात आले. जुन्या मुंबई प्रांतातील बेळगांव,धारवाड,कारवार आणि विजापूर हे चार जिल्हे कर्नाटक राज्यात समाविष्ट करण्यात आले. त्या चारजिल्ह्यात मराठी भाषिकांची संख्या प्रचंड होती. सदर मराठी भाषिक प्रदेश महाराष्ट्रात समाविष्ट करण्याची जनतेची सुरुवातीपासून मागणी होती. तथापि सीमावर्ती प्रदेशातील मराठा जनतेची मागणी अद्याप मान्य झालेली नाही. सीमा भागातील मराठी भाषिक जनतेच्या व्यथाना वाचा फोडून त्यांच्या राजकीय चळवळीला प्रसिध्दी झोतात ठेवण्याच्या कामी पुढारी ने प्रारंभापासून उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. विद्यमान कर्नाटक राज्यातील उत्तर भागातील मराठी भाषिक जनतेची गाऱ्हाणी भाषावार प्रांत रचना होण्यापूर्वी सुध्दा पुढारीतून मांडली जात असत.

' पुढारी ' च्या दि. २१ जून १९५१ च्या अग्रलेखात कानडी अन्यायाचा मामला तपशीलवार मांडला आहे. बेळगांव जिल्ह्याच्या खानापूर तालुक्यातील

नंदगड हे बहुसंख्य मराठी जनतेचे मोठे गाव आहे. `नंदगड` मराठी शेतकी शाळा` ही सर्वात मोठी शाळा आहे. नंदगडला केन्द्रशाळा पात्र असल्याची सिफारस सरकारने नेमलेल्या समितीने केली असता प्रत्यक्षात मात्र ही मान्यता येथील कानडी शाळेला मिळाली. प्रादेशिक भाषा कन्नड आहे अशी शिफारस बेळगाव स्कूल बोर्डाचे अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरांनी केली, त्यामुळे मराठी शाळेवर अन्याय करण्यात आला. बेळगांव जिल्हा द्विभाषिक म्हणून सरकारी मान्यता आहे.तरीपण त्यावर प्रशासकीय ऑफिसरने अतिक्रमण केले. नंदगड भागातील मराठी भाषिक जनतेने या अन्यायाविरुध्द आवाज उठवला. मुंबईचे मुख्यमंत्री व शिक्षण मंत्री श्री.खेर बंगलोर - पूना मेलने पुण्याकडे निघाले असता वाटेत बेळगांव स्टेशनवर नंदगडच्या लोकांनी त्यांची भेट घेतली व या अन्यायाचे निवेदन केले. यावेळी ना.खेर यांनी असे आश्वासन दिले की त्याचा योग्य विचार होईल व कोणावरही अन्याय होऊ दिला जाणार नाही` गुजरात,कर्नाटकात,पोर्तुगीज गोवा,मध्यप्रदेशाचा महाकोशल या सर्व प्रांताकडून मराठीचे लचके तोडले जात आहेत. यासाठी महाराष्ट्राने व महाराष्ट्रीयन जनतेने निर्धारपूर्वक व संघटितपणे हालचाल केल्याशिवाय हे अन्याय दूर होणार नाहीत असे मत` पुढारी ने व्यक्त केले.[२४]

## सरहद्दवाद - प्रकरणी अ.भा.योजना --

`पुढारी` च्या दि.१७ फेब्रुवारी १९६० च्या अग्रलेखात सीमा - हद्दीबाबत अ.भा.योजना काय होती याची चर्चा केली आहे. मुंबईच्या पत्रकार परिषदेत कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री.संजीव रेड्डी यांनी राज्यांराज्यातील सीमा विषयक तंटे मिटविण्यासाठी अखिल भारतीय स्वरुपाची उपाययोजना करण्याचे मत व्यक्त केले. सीमावाद मिटविण्यासाठी ही तरतूद सर्व राज्यांवर बंधनकारक राहाणार आहे. मुंबई - म्हैसूर या राज्यांतील सीमेची कोंडी फोडण्यासाठी बी.डी.जत्तीं चा पाठलाग कॉंग्रेस पुढाऱ्यांनी केला. चार सदस्यांची संयुक्त समिती नेमण्यात आली ही समिती तडजोड सुचविण्यासाठी आहे. या सदस्यांची नियुक्ती मुंबई राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी केली होती. कमिटी नेमली तरी तिच्या

शिफारशी बंधनकारक राहाणार नाहीत अशी भूमिका म्हैसूर सरकारने घेतली. सरहद्दीबाबत मुंबई राज्याच्या मुख्यमंत्र्यानी तर्क शुध्द भूमिका प्रथमपासून निग्रहाने स्वीकारली आहे असे मत पुढारी ने व्यक्त केले. [२५]

म्हसूर राज्यामध्ये समावेश करण्यात आलेल्या सीमा भागातील येळ्ळूर, वडगांव,बेळगाव इ. गावात म्हैसूरी पोलीसांनी केलेल्या अमानुष अत्याचाराचा निषेध करण्यासाठी १९६० सालच्या फेब्रुवारीत कोल्हापूर शहरांत संपूर्णपणे हरताळ पाळण्यात आला. दुकानें, कारखाने,शैक्षणिक संस्था, शाहूमिल,शुगर मिल,गिरण्या, दै.वृत्तपत्रांच्या कचे-या व सिनेमागृहे यांनी या हरताळात भाग घेऊन तो संपूर्णपणे यशस्वी केला. इतक्या मोठ्या प्रमाणावर व शांततापूर्ण हा हरताळ झाला. शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून भव्य मिरवणूक निघाली होती. सायंकाळी ६ वाजल्यानंतर बिंदू चौकात प्रचंड जाहिर सभा घेण्यात आली. या सभेमध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीचे नेते श्री.एस.एम.जोशी, बॅ.नाथ पै. , श्री उध्दवराव पाटील , श्री.दत्ता देशमुख, सीमा लढा समितीचे चिटणीस श्री. दाजीबा देसाई व माधवराव बागल यांची भाषणे झाली.

भाई माधवराव बागल म्हणाले जत्ती मराठी भाषिकांना शत्रू समजतात. या लोकांना ते भारतीय समजत नाहीत, या जनतेच्या विरुध्द कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या नावाखाली जे अत्याचार करण्यात आले ते इतिहासातील आतापर्यन्त नमूद असलेल्या अत्याच्यारांना लाजविणारे झाले.

बॅ.बॅ.नाथ पै म्हणाले बेळगांव वरील अन्याय हा महाराष्ट्र आपल्यावरील अन्याय मानतो. महाराष्ट्र आता उंबरठ्यावर आला आहे. परंतु बेळगांवचा प्रश्न सुटत नाही . म्हैसूर सरकारने या पशूंनाही लाजविले आहे. आमच्या आशेच्या ठिक-या उडाल्या म्हसूर सरकारचा नतिक पराजय.

श्री.दत्ता देशमुख आपल्या भाषणात म्हणाले की, लुईसारख्या नालायक अधिका-यास कोणत्याही अधिकाराच्या जागेवर ठेवता कामा नये. बडतर्फ करून त्याची चौकशी केली पाहिजे. यशवंतरावांनी केन्द्राकडे तार

पाठविणे व महाराष्ट्र कॉंग्रेसचे अध्यक्ष राजारामबापू पाटील यांनी पत्रक काढणे फायद्याचे ठरले. ना.चव्हाणांनी या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी आग्रह धरला पाहिजे सीमा लढा समितीचे नेते श्री.दाजीबा देसाई म्हणाले की येत्या गुढीपाडव्याला संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वांत येणार असे दिसत आहे. परंतु १० लाख मराठी भाषिकांना कानडी मुलखांत लोटून तुम्ही तो आनंदोत्सव साजरा करणार काय ? त्यावेळी आम्हाला गोळ्या खाव्या लागतील,आम्ही निर्धार केला आहे की जगूं तर महाराष्ट्रात,मरूं तर महाराष्ट्रात ! सीमा - भागातील मराठी माणूस लढत मरेल, कानडी होऊन मरणार नाही.[२६] सीमा प्रश्नांकडे भारताच्या पंतप्रधानांनी लक्ष घालावे,त्यासाठी कॉंग्रेसच्या नेत्यांनी आपली गाऱ्हाणी पक्षश्रेष्ठींना कळवावीत.तसेच महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी जातीय लक्ष घालून बेळगांव,महाराष्ट्राला मिळण्याचा प्रयत्न करावा व सीमा भागातील १० लाख मराठी भाषिकावर होणाऱ्या अन्यायाचे निवारण होईल त्यांना खऱ्या अर्थाने न्याय मिळेल, अशी सीमा प्रश्नाबद्दलची 'पुढारी' ची भूमिका होती. यासाठी 'पुढारी' कारांनी आपल्या पत्राच्या माध्यमातून सीमा भागातील जनतेवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. सीमा भागातील जनतेच्या भावना पुढारी मुळे भडकल्या म्हणून पुढारीवर खटला भरला. त्या खटल्यात मालक - प्रकाशक म्हणून श्री.प्रतापसिंह जाधव व संपादक म्हणून श्री.ग.गो.जाधव बातमीदार म्हणून श्री.पुरोहित यांना खटल्यात आरोपी करण्यात आले. बेळगांवचे जिल्हा पोलीस प्रमुख श्री. भट यांच्या सांगण्यावरून कर्नाटक सरकारने खटला भरला होता. खटला अमान्य असल्याचे 'पुढारी' कार यांनी कर्नाटक कोर्टाला कळविले होते. कारण ते त्यावेळी आजारी होते.त्यासाठी त्या अर्जाला डॉक्टरांचे सर्टिफिकेट जोडले होते. कोल्हापूरचे माजी आमदार डी.वाय.पाटील यांच्या मध्यस्थीमुळे संजय गांधीनी खटला मागे घेण्यास तत्कालीन मुख्यमंत्री के. देवराज अर्स यांना सांगितले. गांधीची विनंती मान्य करून खटला मागे घेतला. त्यामुळे 'पुढारी' कार खटल्यातून सुटले अशा प्रकारे 'पुढारी' कारांनी सीमा भागासाठी कार्य केले.

## कोल्हापूरांतील दत्तक प्रकरण --

कोल्हापूरातील दत्तक प्रकरण केवळ कोल्हापूरलाच नव्हे तरसंपूर्ण महाराष्ट्रात गाजले आहे. कोल्हापूरचे छत्रपति श्री.शहाजी महाराज हे निपुत्रिक होते. आपल्यानंतर आपल्या संस्थानाला वारस मिळावा यासाठी त्यांनी भारत सरकारच्या संमतीने नागपूरच्या भोसले घराण्यातील मुलाला दत्तक घेण्याचा निर्णय घेतला. यावरुन हे दत्तक प्रकरण निर्माण झालेले आपणास पहाव्यास मिळते. या प्रकरणाविषयी मोठ्या प्रमाणात गाजावाजा करण्यात आला.याचे उग्र स्वरुप धारण होण्याची शक्यता निर्माण झाली. छत्रपतीं श्री.शहाजी-राजे यांनी नागपूरचा दत्तक घेऊ नये असे मत सौ.पद्माराजे यांचे होते,त्यांना वाटत होते की या छत्रपतींच्या गादीचा वारस जवळच्या नात्यातील असावा. सौ.पद्माराजे यांच्या मुलाला कोल्हापूरच्या गादीवर बसवावे. हाच गादीचा खरा वारस आहे असे सौ.पद्माराजे कदमबांडे यांचे मत होते. पद्माराजे छ.राजाराम महाराजांची कन्या म्हणजे पर्यायाने शहाजी महाराजांच्या भगिणी होत.या वारस प्रकरणाला ठराविक लोकांनी वेगळे वळण लावले, त्यामुळे याचे स्वरुप उग्र झाले. या प्रकरणाचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात उमटले. सर्व महाराष्ट्रीयांना छत्रपतींच्या घराण्याबद्दल आदर वाटतो.पण या प्रकरणामुळे सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. या दत्तक प्रकरणात जास्त गुंतागुंत वाढत गेली.

या गुंतागुंती संबंधी 'पुढारी' तील दि.१६ जून १९६२ च्या अग्रलेखात मत व्यक्त केले आहे. संस्थान विलिन झाल्यावर संस्थानिकांनी कोणता उद्योग करावा,लग्न संबंध कोणाशी जोडावे,दत्तक कोण घ्यावा,नोकर कोण नेमावा हे प्रश्न जनहिताच्यादृष्टीने गौण आहेत. म्हणून 'पुढारी' कारांनी दत्तक प्रकरणावर कांही लिहिले नाही. यापूर्वी अशाच प्रकरणात त्यांचे हात पोळले होते . 'पुढारी' कार म्हणतात की, राजवाड्यातील राजकारणाचे वा घरगुती भांडणाचे भांडवल करुन आम्ही कधी टिका केली नाही. व दहशात घालून कोणाकडून एक पैसा ही घेतला नाही. त्यांना छत्रपतींच्या गादीबद्दल आदर होता. त्यामुळे त्यांच्या वंशजांचे कौटुंबिक मतभेद चव्हाट्यावरील चर्चेचा विषय

व्हावा व राजघराण्यातील स्त्रियांना पुढे करुन छत्रपती घराण्याच्या प्रतिष्ठेचा शक्षा: 'अल्लावा' करावा हे त्यांना योग्य वाटत नाही. दत्तक कोण घ्यावा व कोण घेवू नये हा प्रश्न श्री.छत्रपती महाराजांचा आहे. श्री.सौ.पद्माराजे यांचा मुलगा दत्तक घ्यावा असे त्यांच्या हितचिंतकांना वाटत असेल तर त्यानी श्री. शहाजी महाराजांना भेटून त्यांच्यापुढे मत मांडावे पण या हितचिंतकांनी त्याला जास्त खतपाणी घातले व वेगळे स्वरुप निर्माण केले. याचा परिणाम असा झाला की बहिण व भाऊ यांचे संबंध बिघडले. राजघराण्याची प्रतिष्ठा कमी होऊ लागली. याविषयी ग.गो.जाधव यांनी श्री.कदमबांडे यांची समजूत घातली.[२७]

सौ.पद्माराजे यांच्या मुलास दत्तक घेण्याची मागणी दि. २३ जून १९६२ रोजी कोल्हापूरातील बिंदू चौकातील सभेत करण्यात आली. प्रजा समाजवादी पक्षाची बिंदू चौकात सभा झाली. या सभेत तो ठराव पास झाला. सभेच्या अध्यक्षस्थानी श्री.बापूसाहेब पाटील होते. या सभेत दत्तक प्रकरणाविषयी प्रजा समाजवादी पक्षाची भूमिका समजावून सांगताना प्रजा समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते श्री.अविनाश अडके यांनी मत व्यक्त केले. 'दत्तकाचा प्रश्न हा खाजगी स्वरुपाचा नाही.राजे महाराजांना जो तनखा म्हणून लाखो रुपये दिले जातात ते जनतेच्या करातून दिले जातात म्हणून हा प्रश्न जनतेच्या जीवाभावाचा आहे. शहाजी महाराजांनी अशा महत्वाच्या प्रश्नावर जनतेचे मत आजमाव्यास पाहिजे, तसे दत्तक प्रकरणी घडले नाही म्हणून हा प्रश्न राजकीय बनला आहे असे प्रजा समाजवादी पक्षास वाटते. सौ. पद्माराजे कदमबांडे यांच्या मुलालाच दत्तक घेऊन न्याय गोष्ट महाराजांनी केली पाहिजे.' त्यानंतर श्री.मांगुरे यांनी सांगितले की, दत्तक प्रकरणी चळवळ चालू आहे. सौ. पद्माराजे यांच्या मुलाला कोल्हापूरच्या गादीवर बसविले पाहिजे असा प्रजा समाजवादी पक्षाचा निर्णय आहे. प्रजा समाजवादी पक्षाप्रमाणे इतरही राजकीय पक्षांनी मतभेद बाजूला ठेवून या चळवळीमध्ये भाग घ्यावा असेही त्यांनी सुचविले. छत्रपती शहाजी महाराजांनी नागपूरच्या भोसले घराण्यातील दिलपसिंह याना दत्तक घेण्याचे ठरविले आहे व भारत सरकारने या निर्णयाला मान्यता दिल्याबद्दल दोघांचा

निषेध करणारा ठराव श्री.रविंद्र सबनीस यांनी मांडला तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला. त्यानंतर चौगुले व अध्यक्ष पाटील यांनी जनतेचा कौल बघून मुख्यमंत्री ना.यशवंतराव चव्हाण यांनी प्रश्नात लक्ष घालावे असे आवाहन केले.[२८]

महाराष्ट्र विधान सभेतील चर्चा --

कोल्हापूर शहराचे विधान सभा सदस्य श्री.त्र्यं.सी.कारखानीस यांनी दत्तक प्रश्नासंबंधी प्रश्न विचारुन ता.२८ जून १९६२ रोजी महाराष्ट्र विधान सभेत सविस्तर चर्चा घडवून आणली. त्याचा पुढारीने सविस्तर वृत्तांत दिला आहे. श्री.कारखानीस यांनी कोल्हापूरच्या दत्तक प्रकरणासंबंधी उपस्थित केलेल्या प्रश्नावर बोलताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना.यशवंतराव चव्हाण म्हणाले की सन्माननीय मित्र श्री.कारखानीस यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नासंबंधी एक दोन मुद्याचा मी खुलासा करीत आहे. कोल्हापूर दत्तक विधानाचा प्रश्न गंभीर स्वरुपाचा झाला आहे. सरकारने त्यासंबंधी आपल्यासमोर कांही कसोट्या ठेवल्या आहेत. कोल्हापूरच्या घराण्यासंबंधी अनेकांची आदराची भावना आहे. माझीही तीच भावना आहे. एखाद्या राजघराण्यांत कौटुंबिक मतभेद निर्माण झाले तर विचार करुन निर्णय घेणे जबाबदारीची गोष्ट होऊन बसते. ज्या घराण्याबद्दल लक्षावधी लोकांना आदर वाटतो त्या घराण्याचे प्रश्न लौकिकाला शोभेल अशा दृष्टीने सुटले पाहिजेत. त्यामध्ये मतभेद आणि आंदोलन यांचा अंतर्भाव होता कामा नये अशी आमची इच्छा आहे. ही गोष्ट खरे आहे की, या प्रश्नासंबंधी हिंदुस्थानचे ना.गृहमंत्री यांनी मला फेब्रुवारी महिन्याच्या २८ तारखेला पत्र लिहून माझे मत विचारले होते. त्यावेळी मी त्यांना उत्तर देऊ शकलो नाही कारण त्यावेळी आपण सर्वजण आपापल्या कामात गुंतलो होतो. त्यानंतर मी त्यांना एप्रिलच्या २३ तारखेला उत्तर दिले, त्यात मी माझे जे मत प्रदर्शित केले आहे ते मी वाचून दाखवित आहे " My Dear, Lal Bahadurji, Kindly Refer to your letter the 28th February, regarding request made by the Maharaji of Kolhapur for adoption of his daughter's Son. As far as merits of choice

between Kumar Rajwardhan ( राजवर्धन ) and Kumar Dilipsinrao are concerned it is hardly possible or necessary for me to express any views " हे मी अगदी पहिल्या प्रथम स्पष्ट केले, त्यानंतर मी आणखी एक वाक्य घातले आहे Personally I feel that this is a matter in which His Highness's wishes should be respected.

सौ. पद्माराजेंच्या विषयी ना. चव्हाणांना सदिच्छा . सौ. पद्माराजे यांचे जीवन सुखाचे राहावे यासाठी मी अनेक वेळा प्रयत्न केले आहेत मी कांही वचन दिले होते व ते मी सोडले आहे असा माझ्यावर आरोप करण्यात येतो. या बाबतीत मी वादविवाद करु इच्छित नाही. परंतु जे प्रत्यक्ष घडले आहे ते अगदी मनमोकळेपणाने मी आपल्या पुढे मांडू इच्छितो. श्रीमंत विजयमालादेवी या मला १९५९ मध्ये भेटल्या होत्या. यावेळी श्री. कारखानीस यांनी विचारले सौ. पद्माराजे यांच्या लग्नानंतर भेटल्या होत्या ना ? मुख्यमंत्र्यांना सांगितले नाहीत , ते म्हणाले, त्यांच्या लग्नाच्या अगोदर ज्यावेळी त्यांच्या लग्नाची चर्चा चालू होती, त्यावेळेस त्या मला भेटल्या होत्या. माझे ऑपरेशन झालेले असल्यामुळे त्या मला भेटावयास आल्या होत्या. त्यावेळी त्यांचे व माझे साधारणत: १० ते १५ मिनिटे बोलणे झाले. परंतु त्यावेळी त्यांचे व माझे जे बोलणे झाले त्याचे रेकॉर्ड काही मी ठेवले नाही, मी आपल्यापाशी सर्व मोकळेपणाने बोलावयाचे ठरविले आहे. आणि म्हणून त्यावेळी जे कांही बोलणे झाले ते सर्वच तपशीलवार सांगणे योग्य नसले तरी त्यांतील महत्वाचा भाग मी सांगत आहे. त्यावेळी माझी पत्नी माझ्या पाशी होत्या. त्याप्रसंगी आमचे जे कांही बोलणे झाले ते मला आठवत आहे. परंतु त्याबद्दल खात्री करुन घ्यावी म्हणून माझ्या पत्नीला सुध्दा विचारले की, त्यावेळी आमचे बोलणे काय झाले ? त्यावेळी पद्माराजे यांच्याविषयी चिंता व्यक्त करण्यात आली. त्यांना भेट देत नाहीत, असाहि उल्लेख करण्यात आला. त्याप्रमाणे त्यांच्या विवाहासंबंधी चर्चा झाली तो सर्व तपशील येथे सांगणे बरोबर होणार नाही, परंतु एक गोष्ट महत्वाची आहे

व ती अशी की, त्यावेळी त्याचे लग्न झाले नव्हते आणि त्यामुळेच त्यांच्या मुलाला दत्तक घेण्याचा प्रश्न उपस्थित होणे शक्य नव्हते. दत्तक घ्या असा सल्ला देण्याचा प्रश्न उद्भवणे शक्य नव्हते. महाराजांनी लोकमताचा विचार केला तर बरे होईल याविषयी माझे मत असे आहे की, दत्तक विधानाच्या बाबतीत दत्तक घेणारा आणि दत्तक देऊ इच्छिणारा यांच्या इच्छेशिवाय दुसरे काय महत्वाचे आहे ? अर्थात महाराजांनी लोकमताचा सुध्दा विचार केला तर ते जास्त बरे होईल आ. कारखानीस यांनी विचारले आपण त्यांना कांही सांगू शकणार नाही काय ? त्यावर मुख्यमंत्री म्हणाले याबाबतीत माझे मत असे आहे की, राजघराण्यामध्ये मतभेद निर्माण झाल्यानंतर त्यापैकी एक बाजू घेऊन वितंडवाद वाढविणे बरोबर होणार नाही. या घराण्यासंबंधी मला आदर आहे. लोकांना सुध्दा घराण्यासंबंधी आदर असल्यामुळे लोकांच्या याबाबतीत कांही भावना असणे स्वाभाविक आहे त्या भावनांची तिव्रता किती आहे हे मला माहित आहे. परंतु या राजघराण्याची महाराष्ट्रात प्रतिष्ठा राहिल अशा पध्दतीने हा प्रश्न सुटला पाहिजे. तो एकमेकाचे मन वळवून सोडविला पाहिजे. दडपण आणता कामा नये. सौ. पद्माराजे यांचे लग्न झाल्यानंतर नातेवाईकांना असे वाटले की त्यांना आता आर्थिक सहाय्य मिळणार नाही. त्यावेळी पुढाकार घेऊन व हिंदुस्थान सरकारशी पत्रव्यवहार करुन सरकारतर्फे त्यांच्या लाईफ टाईमपर्यन्त कांही तरी आर्थिक सहाय्य देण्याचे श्रेय माझ्याकडे येते. यावरुन पद्माराजे यांच्या बद्दल माझ्यामनात काय भावना आहेत ते लक्षात येईल. कोल्हापूर शहरात आणि महाराष्ट्रात ज्या भावना व्यक्त झाल्या त्या लक्षात घेतल्यानंतर महाराजेसाहेबांनी दत्तक घेण्याची घाई करु नये असे माझे स्पष्ट मत आहे. आणि ते मी हिंदुस्थान सरकारला कळविले आहे. हिंदुस्थान सरकारला मी अशी विनंती केली आहे की, त्यांनी महाराजेसाहेबांना असा सल्ला द्यावा की अशा तंग वातावरणात दत्तक विधान करुन लोकांच्या भावना अधिक तीव्र करण्याने त्यांच्या दृष्टीने राजघराण्याच्यादृष्टीने आणि आमच्या राज्याच्यादृष्टीने अकारण कष्ट निर्माण होत आहेत. लोकांच्या आज ज्या

भावना आहेत त्यांच्या विरुध्द जाऊन दत्तक विधान करण्याचा प्रयत्न करणे बरोबर नाही. आजच महाराष्ट्र सरकारने हिंदुस्थान सरकारला असे कळविले आहे की, सध्या दत्तक विधान स्थगित झाले तर योग्य होईल यापेक्षा मी जास्त काय सांगू शकणार ?

कोल्हापूरच्या जनतेला मी विनंती करीत आहे की, कोणाच्याही संबंधाने संशय किंवा राग मनांत धरु नये. आंदोलनाचे जे स्वरुप आहे तसे ठेवू नये. आ.कारखानीस यांना मी अशी विनंती करतो की त्यांनी माझ्या भावना कोल्हापूरच्या जनतेपर्यन्त पोचविण्यात याव्यात. राजघराण्यातील एकी आणि प्रतिष्ठा कायम राहिली पाहिजे. या छोटया प्रश्नाला वादंगाचे स्वरुप देऊन संकट ओढवून घेणे योग्य नाही. पद्माराजे यांच्याबाबत जनतेच्या कांही भावना आहेत. राजाराम महाराजांच्या या महान कन्येविषयी स्त्रियांच्या भावनाप्रखर आहेत. कोल्हापूरचे प्रतिनिधि श्री.कारखानीस यांनी माझ्या तर्फे कोल्हापूरच्या जनतेला या भावना जाऊन सांगाव्यात. [२९]

कोल्हापूरच्या दत्तक प्रकरणाविषयी ' पुढारी ' कार ग.गो.जाधव यांनी आपली भूमिका खालील प्रमाणे मांडली आहे. संस्थान विलीन झाले आहे. त्यावर जनतेचा हक्क चालत नाही. जनतेच्या दृष्टीने हे दत्तक प्रकरण गौण आहे. याबाबत ' पुढारी ' ने एक वेळाच आपले मत व्यक्त केले आहे. शिवछत्रपतींच्या गादीबद्दल आदर आहे. त्यांच्या वंशजांचे कौटुंबिक मतभेद चव्हाट्यावर आणु नये. राजघराण्यांतील स्त्रियांना पुढे करुन आपला स्वार्थ साधू नये. राजघराण्यांची प्रतिष्ठा घालवू नये. दत्तक कोण घ्यावा व कोणाला घेऊ नये हा प्रश्न श्रीमंत छत्रपती महाराजांचा आहे असे मत ' पुढारी ' ने व्यक्त केले आहे.

राष्ट्रीय संकट ( चीन युध्द )

१९४७ साली भारत देश स्वातंत्र झाला. तेव्हापासून चीन व भारताचे संबंध सलोख्याचे होते. चीनच्या अध्यक्षानी भारताला भेटी दिल्या होत्या. मैत्रीचा

करार केला होता. मोठ्या प्रमाणात या देशातून देवाण-घेवाण चालत होती. परराष्ट्रीय संबंध वाढत चालले होते. चीन बाबत भारताला आत्मविश्वास होता. चीन हा लोकसंख्येच्या मानाने जगात प्रथम क्रमांकाचा देश होता. चीन हे भारताच्या शेजारी राष्ट्र होते. यासाठी भारतांनी शेजारच्या राष्ट्राशी स्लोख्याचे ( मैत्रीचे ) संबंध ठेवले होते. भारताने प्रथम पासून अलिप्तता वाद स्वीकारलेला होता. चीन राष्ट्रावर भारताचा विश्वास होता पण चीनने भारताचा विश्वास घात केला. २० ऑक्टोबर १९६२ रोजी भारत - चीन युध्दास सुरुवात झाली. चिनी आक्रमणाने निर्माण झालेल्या राष्ट्रीय संकटाबाबत पुढारीचा दृष्टीकोण काय होता हे पाहाणे उद्बोधक ठरते.

१९६२ च्या चिनी आक्रमणासारख्या गंभीर राष्ट्रीय संकटाची `पुढारी'ने तात्काळ नोंद घेणे स्वाभाविकच होते. या राष्ट्रीय संकटाची `पुढारी'ने आपल्या अग्रलेखात चर्चा केली असून कारवाईची आवश्यकता प्रतिपादली आहे. आक्रमक चीनी सैन्यास भारतीय प्रदेशातून हाकलून लावणे आणि नेफा आघाडीच्या मजबुतीचे प्रयत्न करणे हे दोन महत्वाचे निर्णय भारत सरकारने घेतले आहेत. त्यामुळे चीनी सैनिकांच्या अचानक मुसंडी मारण्याचा प्रयत्नांना या आघाडीवर यश लाभणार नाही. गेल्या महिन्यापासून आपल्या देशाच्या संरक्षण खात्याने नेफा आघाडीवर जी उपाययोजना केली आहे त्यावरून वरील मतास पुष्टी मिळते. भारताच्या उत्तर सीमेवर युध्द जन्य परिस्थिती निर्माण होत आहे. या मध्ये शीतयुध्दाचे प्रमाणच अधिक आहे. उत्तर सीमेवरील स्फोटक परिस्थितीमुळे भारताच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक परिस्थितीवर दूरगामी परिणाम होणार आहेत. यातुन भारताला निभावून घेतले पाहिजे, ज्या ठिकाणी सैनिकी हालचाली होत आहेत, त्या भागातील जनतेचे मनोधैर्य वाखाणण्यासारखे आहे. भारताच्या कानाकोपऱ्यातून हे आक्रमण राष्ट्रीय संकट आहे असे सर्वजण समजतात. प्रतिकार करण्याची तयारीत आहेत. भारतातील फुटीरांना धडा शिकविणे आद्य कर्तव्य आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्ष वगळल्यास इतर सर्व प्रमुख राजकीय पक्षाचे या कामी सहकार्य होईल. भारतीय कम्युनिस्टांना स्वतंत्र अस्तित्व नाही. मॅकमॅहॉन

रेषा ही चीन - भारत यांच्या मधील सरहद्द हे मान्य करनही चीनने भारतीय प्रदेशावर आक्रमण केले असे हे म्हणण्याचे धाडस भारतीय कम्युनिष्ट पक्षास झाले नाही. गंभीर राष्ट्रीय संकटाची दखल पंतप्रधानानी सर्व राज्याच्या मुख्य - मंत्र्यांना दिली आहे. चीनी आक्रमक सेना भारतीय हद्दीतून हाकलण्याची कारवाई भारत सरकारने करावी असे पुढारी कारांना वाटत आहे.[30]

घुम चक्रीचा वृत्तांत --

उत्तर सीमेवर चीनी सेने बरोबर होत असलेल्या घुमचक्रीचे स्वरनप स्पष्ट करनन भारतीय प्रदेशातून शत्रूला उखडून टाकण्याची निकड पुढारी ने प्रतिपादली आहे. आपल्या अग्रलेखात पुढारी ने पुढील प्रमाणे मतप्रतिपादन केले आहे. भारताच्या उत्तर सीमेवर घनघोर रणसंग्रामास सुरनवात झाली. लडाख आणि नेफा या दोन्ही आघाडयांवर चीनच्या सैनिकांनी शनिवारी पहाटे जोरदार धडक मारली. संरक्षक स्वरनपाची सुसज्ज व्यवस्था असतांनाही माघार घ्यावी लागली. नेफा आघाडीवरील भारताची छोटी तीन ठाणी व लडाख आघाडीवरील एक ठाणे चीन सैनिकाच्या ताब्यात गेले. तिबेटचे पठार व हिमालयाची उतरण (कडा ) याचा उपयोग एखाद्या किल्याप्रमाणे चिनी लोकांना झाला. भारताला हवाई मार्गाचा अवलंब करावा लागला. या घुमचक्रीत दोन्ही देशाची हानी मोठी झाली. त्यात चीनची हानी मोठ्या प्रमाणात झाली. भारतीय सैनिकांना वेळेवर रसद मिळाली असती तर त्यांनी ठाणे सोडले नसते. चीनने नेपाळ, भूतानचा प्रदेश वगळून सर्वत्र उत्तर सरहदीवर आक्रमक हालचाली केल्या. या हालचालीच्या तयारी साठी अनेक महिन्याचा कालावधी लागला. इकडे मैत्रीच्या वाटाघाटी चालू असताना तिकडे तयारी चालू होती. जिनेव्हा येथे लाओस संबंधीच्या करारावर सह्या करण्यासाठी म्हणून चीनचे परराष्ट्र मंत्री मार्शल चेन यी आणि भारताचे संरक्षण मंत्री कृष्ण मेनन उपस्थित होते. या दोन्ही प्रतिनिधींची जी बोलणी झाली त्यात मार्शल चेन यी यांनी उत्तर सरहद्दीवरच्या 'चकमकी' स्थानिक स्वरनपाच्या आहेत असे म्हटले ,श्री मेनन

दिल्लीस आल्यानंतर जिनेव्हा येथे मार्शलशी झालेल्या वाटाघाटीचा अहवाल पंतप्रधानाना सादर केला. त्यानंतर पंतप्रधानानी भारताच्या उत्तर सरहद्दीवरील परिस्थिती गंभीर नसल्याचे सांगितले जो भारताचा प्रदेश चीनने व्यापला आहे त्यातून हाकलून देण्याचे काम भारतीय सैनिक यशस्वीपणे पार पाडतील असा विश्वास पंतप्रधान नेहरूंनी बोलून दाखवला आहे."[31] आग्नेय आशियायी देशातील लोकशाहीचे भवितव्य भारत चीन युध्द क्षेत्रावर अवलंबून आहे असे 'पुढारी' कार ग.गो. जाधव यांचे मत आहे.

युध्दबंदी --

चीनने एकतर्फी जाहीर केलेली युध्दबंदी आणि चीन बरोबरच्या संबंधाबाबत पुढारीने आपल्या अग्रलेखात खालील प्रमाणे स्पष्ट मत मांडलेले आहे "चीनने एकतर्फी जाहीर केलेली गोळीबार बंदी आणि त्या सोबत भारत सरकार कडे पाठविलेल्या अटी या गुंतागुंतीत भारत सरकार सापडणार नाही अशी घोषणा पंतप्रधान नेहरूंनी केली आहे. चीनने जाहीर केलेल्या गोळीबार बंदी योजनेत जी संदिग्ध स्थळे आहेत, त्यासंबंधी भारत सरकारने पेकिंग सरकारकडे खुलासा मागितला आहे. खुलासा आल्यानंतर भारत सरकार जागरूकपणे विचार करणार आहे. चीनने केलेल्या खुलाशामुळे जे चित्र निर्माण झाले आहे त्यावरून नेफा विभागातील अत्यंत मोक्याची ठाणी चिनच्या ताब्यात राहाणार आहेत. चीनची आक्रमक सेना मॅकमोहॅान रेषेच्याही मागे जरी गेली तरीही या ठाण्यावरील चीनच्या लष्कराचे नियंत्रण कायम राहाणार. या मध्ये भारताचा निर्मळ असा जो प्रदेश आहे त्यातूनही भारतीय लष्करास आणखी माघार घ्यावी लागेल. मध्य आघाडीवरील परिस्थिती अशीच आहे. लडाखमधील आघाडीची ठाणी सोडण्याचा चीनचा इरादा नाही. नेफा भागामध्ये माघार घेण्याचे आमीष दाखवून लडाखमध्ये चीनने प्रत्यक्ष बळकावलेला सर्व प्रदेश स्वत:कडे ठेवण्याचा डाव टाकला आहे. प्रत्यक्ष युध्द आघाडी बरोबरच चीनने प्रचंड प्रचार आघाडी भारताविरोधी वातावरण तयार करण्यासाठी उघडली आहे. या आघाडीवर भारताला सामना द्यावयाचा आहे. हा सामना चिवट व प्रदीर्घ काळ चालणारा आहे. अशी लक्षणे दिसत आहेत. चीनवर दडपण आणण्यासाठी भारताने

तटस्थ राष्ट्राकडे तज्ञ अधिकारी पाठविले व आपली भूमिका सांगितली. या तटस्थ राष्ट्रामध्ये संयुक्त अरब लोक सत्ताक आणि अध्यक्ष नस्सर याची भारताच्या भूमिकेबद्दल चांगले मत झाले आहे अशा प्रकारे ' पुढारी' कार ग.गो.जाधवांनी युध्दबंदी विषयी आपले मत व्यक्त केले आहे.[३२]

कॉंग्रेस मधील फूट ( १९६९ )

व्यापारासाठी हाती तराजू घेऊन आलेल्या इंग्रजानी भारतीय राजकर्त्यांच्या दुबळेपणाचा फायदा घेऊन भारतावर जवळ जवळ १५० वर्षे आपली अनिर्बन्ध सत्ता बसविली. १७५७ च्या प्लासीच्या युध्दानंतर १०० वर्षानी म्हणजे १८५७ मध्ये ब्रिटिशाना हुसकावून लावण्याचा अयशस्वी प्रयत्न भारतीयांनी केला. यानंतर भारतीय स्वातंत्र्यासाठी कायम स्वरुपी एक संघटना असावी असा विचार कांही शिकलेल्यांच्या मनात डोकावू लागला व त्यातूनच १८८५ ला राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाली. १८८५ पासून १९४७ पर्यन्त स्वातंत्र्य प्राप्तीच्या आंदोलनात महत्वाची भूमिका बजावली, किंबहुना कॉंग्रेस मुळे देशाला स्वातंत्र्य मिळाले असे म्हटले तरी वावगे होणार नाही.

१९५२ ते १९६७ पर्यन्त कॉंग्रेस पक्ष सत्तेवर होता. प्रथम पासूनच कॉंग्रेस मध्ये दोन गट होते. डाव्यागटाचे नेतृत्व पंडित नेहरुंच्या कडे होते. उजवा गट सरदार पटेल यांच्या अधिपत्याखाली होता. सरदार पटेलांच्या मृत्युनंतर तोलाचा नेता उजव्या गटाकडे नव्हता, त्यामुळे कॉंग्रेसची सर्व सत्ता नेहरुंच्या हाती होती. श्रीमती इंदिरा गांधी भारताच्या पंतप्रधान असताना संसदेत दोन ठराव मांडण्यात आले होते. बॅंकांचे राष्ट्रीयकरण व संस्थानिकांचे तनखे रद्द करणे. या ठरावाला कॉंग्रेस पक्षातून विरोध झाला होता. पहिल्यापासूनच कॉंग्रेस मधील बडे नेते सरंजामी मनोवृत्तीचे होते. श्रीमती इंदिरा गांधी व त्यांच्या सहकाऱ्यांनी या बिलांचा पुरस्कार केला. या सरंजामवृत्तीच्या लोकांनी विरोध दर्शविला होता. त्यामध्ये मुरारजी देसाई व अनेक मंडळींनी त्याला विरोध दर्शविला होता. या विषयाचे निमित्त करुन सिंडिकेट व इंडिकेट असे दोन गट निर्माण झाले.

KOLHAPUR

सिंडिकेटचे नेतृत्व मुरारजी देसाई, स.का.पाटील,कामराज, निजलिंगप्पा यांच्याकडे होते. इंडिकेटचे नेतृत्व श्रीमती इंदिरा गांधी कडे होते. श्रीमती इंदिरा गांधीना ना.यशवंतरावजी चव्हाण,श्री.जगजीवनराम या सारख्या मातब्बर नेत्यांचे सहकार्य मिळाले होते. सिंडिकेट गटाच्या मंडळींनी श्रीमती इंदिरा गांधीना पक्षातून काढून टाकण्याचा प्रयत्न केला होता. बहुमताच्या जोरावर श्रीमती इंदिरा गांधीनी तो डाव फेटाळून लावला. आरोप-प्रत्यारोप यामुळे कॉंग्रेस पक्षाला वेगळे वळण लागले. या कारणामुळे १९६९ ला कॉंग्रेस मध्ये फूट पडली हे आपणास पहावयास मिळते.

१९४७ पासून कॉंग्रेस पक्ष केन्द्रात सत्ताधारी पक्ष म्हणून राज्यकारभार पाहतो आहे. सत्ताधारी पक्षात सर्व थरातील लोकांची गर्दी असते. तीच अवस्था कॉंग्रस पक्षाची झाली आहे. या पक्षामध्ये प्रतिगामी व पुरोगामी तसेच लोकशाहीवादी व सरंजामदारी वृत्त एकत्र वावरत होत्या. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी व काही पुरोगामी खासदारानी काही क्रांतिकारक निर्णय राबविण्याचा निर्णय घेतला उदा.बँकांचे राष्ट्रीयकरण व संस्थानिकांचे तनखे रद्द करणे ही दोन विधेयके संसदेमध्ये मांडण्याचे ठरले. इंदिरा गांधीनी ही अवघड जबाबदारी यशवंतरावांच्याकडे सोपविली होती पण ही बिले पास होण्यासाठी सत्ताधारी पक्षातून विरोध होऊ लागला. यामधून या बीलाचा पुरस्कार करणारा इंडिकेट गट व त्याचे नेतृत्व इंदिरा गांधी यांच्याकडे होते तसेच या बिलाला विरोध करणारा सिंडिकेट गट त्याचे नेतृत्व मुरारजी देसाई ,स.का. पाटील ,कामराज, निजलिंगप्पा वगैरे मंडळींकडे होते.[३३]

श्रीमती इंदिरा गांधी ,श्री.यशवंतराव चव्हाण,श्री.जगजीवनराम व श्री.फकरुद्दीन अलिअहमद यांचे कॉंग्रेस पक्ष सदस्य रद्द करावयाचे संसदेच्या आगामी नोव्हेंबर १७च्या बैठकीपूर्वी संसदीय कॉंग्रेस पक्षाला श्रीमती गांधीच्या जागी नव्या नेत्याची निवड करण्याचा सिंडिकेटचा हेतू होता . दिवसभर चर्चा होऊन कट रचला व सुरुवात म्हणून कॉंग्रेस अध्यक्षानी पंतप्रधान श्रीमती गांधीना

एक सह्यापानी आरोप पत्र वजा खलिता पाठविला आहे. या पत्रात श्री. निजलिंगप्पा यांनी श्रीमती इंदिरा गांधी व त्यांच्या जेष्ठ सहका-यांविरुध्द पक्ष विरोधी कृत्ये केल्याचा आरोप केला. [३४]

दोन्ही बाजू आपापल्या भूमिकांना ठाम चिकटून असून ठराव प्रति ठराव ,उत्तर-प्रत्युत्तर,खुलासे-प्रती खुलासे यांच्या आंतषबाजीने राजधानी दिल्लीतील वातावरण भरुन गेले आहे. आसामचे मुख्यमंत्री श्री बिमलाप्रसाद चालिहा यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र,राजस्थान,मध्यप्रदेश,उत्तरप्रदेश,आंध्र - प्रदेश या कॉंग्रेस शासीत राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी ऐक्यासाठी भगीरथ प्रयत्न केले. या घडलेल्या घडामोडीत कॉंग्रेस अध्यक्ष श्री. निजलिंगाप्पा व श्रीमती इंदिरा गांधी यांच्या अध्यक्षतेखाली वर्किंग कमिटीच्या दोन गटांच्या झालेल्या बैठकीत श्री. जगजीवनराम यांच्या अध्यक्षतेखाली १५० खासदारांची बैठक झाली. एकमेकांच्या आरोपामुळे या पक्षात फूट पडण्याची शक्यता वाटू लागली. [३५]

<u>नवी दिल्ली</u> -- १२ नोव्हेंबर १९६९ ( प्रे.ट्र. )

श्री. निजलिंगप्पाच्या अध्यक्षतेखाली कॉंग्रेस वर्किंग कमिटीची बैठक भरली.या बैठकीत पंतप्रधान श्रीमती गांधी यांचे कॉंग्रेसचे प्राथमिक सदस्यत्व रद्द करुन त्यांना कॉंग्रेस पक्षातून काढून टाकण्यात आल्याचा आणि त्याच बरोबर संसदीय पक्षाचा नेता निवडण्याचा आदेश देणारा असे दोन निर्णय घेण्यात आले.

कार्यकारिणीच्या या दोन ठरावावर बोलताना अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे सेक्रेटरी श्री. सादीक अली म्हणाले की हे दोन्ही ठराव कार्यकारिणीने एकमुखाने व एकमताने घेतले आहेत. कार्यकारिणीचे अध्यक्ष श्री. निजलिंगाप्पा व सादीक अली यांच्या शिवाय इतर सदस्य श्री.स.का.पाटील, मोरारजी देसाई, के.कामराज, हितेन्द्र देसाई,सी.बी.गुप्ता,के.सी.अब्राहाम, डॉ.रामसुभग सिंह,पी. व्यंकटसुब्बय्या हे सर्व सदस्य बैठकीला हजर होते व दुस-या ठरावात एकजुटीचे आवाहन केले. [३६]

## सिंडिकेटचा बार फुसका ठरला --

' पुढारी ' कार ग.गो.जाधव यांनी दि.१४ नोव्हेंबर १९६९ च्या अग्रलेखात सिंडिकेटची अवस्था कशी व तिला कशाप्रकारे अपयश आले या बाबत खालील मत व्यक्त केले आहे. कॉंग्रेस वर्किंग कमिटीचे अकरा सदस्य व स्वतः कॉंग्रेस अध्यक्ष यांनी जो ठराव पास केला होता तो म्हणजे श्रीमती गांधीचे प्राथमिक सदस्यत्व रद्द करुन त्यांना पक्षातून काढुन टाकले व नवा नेता निवडणे पण फतव्याचा उपयोग झाला नाही. कारण अ.भा.कॉंग्रेस कमिटीचे बहुसंख्येने सदस्य सिंडिकेटच्या विरुध्द गेले होते. प्रत्यक्षात गुरुवारी सकाळी संसदेत कॉंग्रेस पक्षाची बैठक भरली होती. ही बैठक इंदिरा गांधीच्या अध्यक्षतेखाली होती. सिंडिकेटचा फतवा धाब्यावर बसवून ४३२ पैकी ३३० खासदार या बैठकीला हजर होते.या सर्व खासदारांनी आपला विश्वास इंदिरा गांधींच्या नेतृत्वावर ठेवला. हा ठराव गृहमंत्री श्री.यशवंतराव चव्हाण यांनी मांडला व श्री.जगजीवनराम यांनी त्यास अनुमोदन दिले. सिंडिकेटने आदल्या दिवशी संमत केलेला ठराव फुसका निघाला. सिंडिकेटने हा लोकशाहीचा निर्णय मान्य करावा तसे या मंडळीने केले नाही. ठराव व कायदे करुन चालत नाही तर त्याची अंमलबजावणी करणारी शक्ती जवळ असावी लागते. जनतेपासून व खुद्द कॉंग्रेस पक्षातील सामान्य सदस्यापासून दूरावलेले सिंडिकेट नेते यांच्या जवळ ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी लागणारे सामर्थ्य नाही.पहिल्याच लढाईत सिंडिकेट हरले असे मत ' पुढारी ' कारांनी व्यक्त केले.[३७]

## ' समाजवादाचा उदोउदो । व पंडितजींवर टिका '

' पुढारी ' कार ग.गो.जाधव यानी दि.२० डिसेंबर १९६९ मधील ' पुढारी ' च्या अग्रलेखात गांधीनगर येथे सिंडिकेट गटाचे अधिवेशनासंबंधी पुढील वृत्तांत आढळतो. गांधीनगर येथील अधिवेशन सिंडिकेट गटानी भरविले होते. या अधिवेशनात पंतप्रधान गांधी यांच्या विरुध्द टिका करण्यात आली.एवढेच

नव्हे तर स्व.नेहरूंना या सध्याच्या वादात ओढून टिका करण्यात आली.श्रीमती तारकेश्वरी सिंहा बाईने असे विचार मांडले की भारतात समाजवाद न येण्यास स्व.पंडित नेहरूच जबाबदार व दोषी असल्याचे मत व्यक्त केले. पंडितजीशी मतभेद आसल्याने अठरा एकोणीस वर्षापूर्वी कॉंग्रेस पक्ष सोडलेले आचार्य कृपलानी या अधिवेशनात हजर होते.त्यांनी पंडित नेहरूंच्यावर टिका करून आपला जुना राग व्यक्त केला. श्रीमती सिन्हा व आचार्य कृपलानींच नव्हे तर या कॉंग्रेस अधिवेशनाचा सारा रंग नेहरू विरोधी होता. श्री.निजलिंगप्पा व त्यांच्या संघटना कॉंग्रेस मधील नेते यांनी समाजवादाचा पुरस्कार केला.देशात प्रचंड मूलभूत कारखानदारी उभी करणाऱ्या पंडितजीवरच `समाजवाद` न आणल्याबद्दल टिका केली.[३८]

`जनतेने साथ दिली,आता नेत्यावर जबाबदारी`

`पुढारी` कार ग.गो.जाधव यांनी `पुढारी` तील दि.२७ डिसेंबर १९६९ च्या आग्रलेखात इंडिकेटच्या महाराष्ट्राच्या राजधानीमध्ये कॉंग्रेसचे ७३ वे अधिवेशन झाले त्याचा वृत्तात खालीलप्रमाणे दिला आहे. या महाराष्ट्राच्या राजधानीतील कॉंग्रेसच्या ७३ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री.जगजीवनराम आणि पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचे गुरुवारी अतिप्रचंड व अभूतपूर्व स्वागत झाले. कॉंग्रेसचे अधिवेशन ३५ वर्षानंतर प्रथम मुंबईत भरले होते. २७ वर्षानंतर त्या `छोडो भारत` चळवळीतील दोन झुंजार शिपाई या अधिवेशनामागील प्रेरणा व स्फूर्ति बनल्या आहेत. ना.यशवंतराव चव्हाण व स्वागत समितीचे अध्यक्ष श्री वसंतरावदादा पाटील यांच्या पुढाकाराने पार पडत असलेल्या अधिवेशनाच्या निमित्ताने खऱ्या मराठमोळ्या महाराष्ट्राचे दर्शन कॉंग्रेस अध्यक्ष व पंतप्रधान गांधी आणि देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या कॉंग्रेसजनानी पहिल्या दिवशी घडविले. राजकीय आझादी नंतर आर्थिक आझादीच्या समस्येची चर्चा करणारे हे अधिवेशन मुंबईत भरले. महाराष्ट्राचेच राजकीय ,सामाजिक चळवळीत नेहमीच

पुरोगामीत्वाचा झेंडा फडकवत ठेवला. सामाजिक व आर्थिक न्यायासाठी चाललेल्या लोकशाही समाजवादाच्या चळवळीतहि महाराष्ट्र अग्रेस राहिल. या अधिवेशनात 'गरिबी हटाव' या दिशेने नेत्याना आगेकूच करण्यासाठी हिरवा कंदील दाखवला आहे. लोकशाही मार्गाने सर्वांना न्याय देणारी समाज व्यवस्था निर्माण करण्याची जनतेने कॉंग्रेसला दिलेली ही अखेरची संधी होती. मुंबईचे कॉंग्रेस अधिवेशन एका नव्या युगाचा प्रारंभ ठरेल अशी आशा 'पुढारी' ने व्यक्त केली.[३९]

## नव्या कॉंग्रेसचा जन्म

दै.'पुढारी'कार ग.गो.जाधव यांनी पुढारी मध्ये दि.३१ डिसेंबर १९६९ च्या अग्रलेखात नव्या कॉंग्रेसच्या जन्माविषयी भाष्य केलेले आढळते. ब्रिटिश सत्तेशी झुंजून जिने स्वातंत्र्य मिळविले त्या भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचा जन्म मुंबईत झाला. आणि परवा ७३ व्या कॉंग्रेस अधिवेशनातून मुंबईतच नव्या कॉंग्रेसचा जन्म झाला.पंडित नेहरूंच्या प्रेरणेनेच कॉंग्रेस पक्षाने आवडी येथे समाजवादी समाज रचनेचा ठराव केला. भुवनेश्वर येथे समाजवादी कार्यक्रम मंजूर केला.त्यामागे पंडितजींचेच नेतृत्व व प्रेरणा होती. कॉंग्रेसच्या मुंबई येथील ७३ व्या अधिवेशनाने हे चित्र बदलून टाकले. लाखो माणसे या नव्या कॉंग्रेसच्या मंडपात जमली आणि ती सारी गिरण्या,कारखाने,कार्यालये,बंदरे,आदि ठिकाणी काम करणारी सामान्य माणसे होती. देशाच्या कानाकोपऱ्यातून हजारो कार्यकर्ते आझाद मैदानावर जमले. या अधिवेशनाचे वैशिष्ट्य म्हणजे जे तावडतोब करणे शक्य आहे त्याची घोषणा करण्यात आली. महाराष्ट्राचे नेते ना.यशवंतराव चव्हाण यांनी आश्वासन दिले ,त्यामुळे सर्वांना समाधान वाटले.पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यानीच या नवीन कॉंग्रेसचे नेतृत्व पत्करले. व कॉंग्रेस पक्षातील,सरकार मधील उच्च पण जीर्ण मताच्या जुन्या नेतृत्वाविरुध्द बंड पुकारले. बंगलोर येथील कॉंग्रेस महासमितीच्या वेळी सुरु झालेल्या या कॉंग्रेस अंतर्गत संघर्षातून कॉंग्रेसचे दोन गट निर्माण झाले. त्यानंतर मुंबई ७३ वे अधिवेशन पार पडले हे

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

अधिवेशन इंदिरा गांधीच्या नेतृत्वाखाली व जगजीवनराम यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या अधिवेशनातून जुन्या कॉंग्रेस पक्षाचा कायापालट होऊन नवीन कॉंग्रेस जन्माला आली. महाराष्ट्राच्या राजधानीने नवीन कॉंग्रेसला जन्म दिला.[४०]

संस्थानच्या विलीनीकरणापासून ते १९७२ पर्यंतच्या काळात दक्षिण महाराष्ट्रात झालेल्या राजकीय चळवळी, घडामोडी यांचे स्पष्ट प्रतिबिंब आपणास 'पुढारी' च्या बातमी पत्रात व अग्रलेखात पहावयास मिळते. दक्षिण महाराष्ट्रातील वरील कालखंडातील राजकीय घडामोडीचे यथार्थ आकलन होण्यास पुढारी अत्यंत उपयोगी ठरतो. 'पुढारी' ने दक्षिण महाराष्ट्रात १९४९ ते १९७२ या कालावधीत घडलेल्या महत्वांच्या राजकीय घडामोडींना तांतडीने नोंद घेतल्याचे आढळते. पुढारीच्या अग्रलेखातून व विविध रकान्यातून तत्कालीन जनमताचे अचूक दर्शन घडते. परखड मत प्रदर्शनामुळे 'पुढारी' चे अनेक अग्रलेख वैशिष्टयपूर्ण तसेच मार्गदर्शन ठरले आहेत. 'पुढारी' कार श्री.ग.गो.जाधव यांच्या समतोल राजकीय दृष्टीकोणामुळे राजकीय घडामोडीविषयीचे पुढारीतील लेखन वास्तववादी व म्हणूनच ऐतिहासिक दृष्टया अधिक उपयुक्त झाले आहे.

## संदर्भ व तळ टिपा


१. कणबरकर, रा.कृ. व डॉ.जाधव रमेश, - भाई माधवराव बागल संक्षिप्त चरित्र, पृ.क्र. ६५-६६.

२. दै.पुढारी कोल्हापूर - ता.१२ मार्च १९४९,पा.नं.१

३. ,, - ता.८ मार्च १९४९,पा.नं.३

४ ,, - ता.११ जानेवारी १९४९,पा.नं.२

५ ,, - ता.९ एप्रिल १९४९,पा.नं.१

६ ,, - ता.५ फेब्रुवारी १९५०,पा.नं.२

७ ,, - ता.१६ जुलै १९५३,पा.नं.२

८ ,, - ता.४ नोव्हेंबर १९५३,पा.नं.२

९ ,, - ता.१५ नोव्हेंबर १९५३,पा.नं.२

१० ,, - ता.२६ ऑक्टोबर १९५५,पा.नं.२

११ ,, - ता.२४ डिसेंबर १९५५,पा.नं.२

१२ ,, - ता.२९ जानेवारी १९५६,पा.नं.२

१३ ,, - ता.२६ एप्रिल १९५६,पा.नं.२

१४ ,, ता.१८ ऑक्टोबर १९५६,पा.नं.२

१५ ,, - ता.२४ नोव्हेंबर १९५९,पा.नं.२

१६ ,, - ता.१७ मार्च १९६०,पा.नं.२

१७ ,, - ता.२ एप्रिल १९६०,पा.नं.२

१८ ,, - ता.१ मे १९६०,पा.नं.२

१९ ,, - ता.२४ फेब्रुवारी १९५५,पा.नं.२

२० ,, - ता.३० एप्रिल १९५५,पा.नं.२

२१ ,, - ता.२५ मे १९५५,पा.नं.२

२२ ,, - ता.६ मे १९६१,पा.नं.२

२३ ,, - ता.२० डिसेंबर १९६१,पा.नं.१

२४ ,, - ता.२१ जून १९५१,पा.नं.२

२५ ,, - ता.१७ फेब्रुवारी १९६०,पा.नं.२

२६ दै.पुढारी कोल्हापूर - ता.१७ फेब्रुवारी १९६०, पा.नं.१

२७ ,, - ता.१६ जून १९६२,पा.नं.२

२८ ,, - ता.२४ जून १९६२, पा.नं.१

२९ ,, - ता.२९ जून १९६२, पा.नं.१

३० ,, - ता.२० ऑक्टोबर १९६२,पा.नं.२

३१ ,, - ता.२३ ऑक्टोबर १९६२,पा.नं.२

३२ ,, - ता.३० नोव्हेंबर १९६२,पा.नं.२

३३ प्रा.माने ए.डी. शिल्पकार यशवंतराव चव्हाण - पृ.क्र.५७-५८.

३४ दै.पुढारी कोल्हापूर - ता.३१ ऑक्टोबर १९६९,पा.नं.१

३५ ,, - ता.३ नोव्हेंबर,१९६९,पा.नं.१

३६ ,, - ता.१३ नोव्हेंबर १९६९, पा.नं.१

३७ ,, - ता.१४ नोव्हेंबर १९६९,पा.नं.२

३८ ,, - ता.२० डिसेंबर १९६९, पा.नं.२

३९ ,, - ता.२७ डिसेंबर १९६९,पा.नं.२

४० ,, - ता.३१ डिसेंबर १९६९,पा.नं.२.